बुधवार, १३ सप्टेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ४४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • WEDNESDAY 13 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-44 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# त्यानंतर मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरकू देणार नाही

## मनोज जरांगे पाटील आक्रमक : आरक्षणासाठी सरकारला आणखी एक महिन्याचा वेळ

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले असून, त्यांच्या उपोषणाचा 15 दिवस असून बुधवारी त्यांनी महत्वाची भूमिका स्पष्ट केली. सरकार एक महिन्याचा वेळ मागत आहे. उद्या त्यांनी आम्हाला वेळ दिला नसल्याचे म्हणू नये. त्यामुळे असेही पंधरा दिवस गेले असून, सरकारला आणखी एक महिन्याचा वेळ देण्यात येत आहे. त्यांनी एक महिन्यात आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावला पाहिजे. मात्र, तीस दिवस संपल्यावर 31 व्या दिवशी राज्यातील एकाही मंत्र्याला महाराष्ट्राच्या सीमेवर फिरकू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला.**

मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या उपोषणासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी मुंबईत बैठक पार पडली होती. दरम्यान या बैठकीनंतर मनोज जरांगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आम्हाला एक महिन्याचा वेळ हवा आहे, अशी सरकारची भूमिका आहे. त्यामुळे सरकारला एक महिन्याचा वेळ दिला पाहिजे. सरकारने या एक महिन्यात आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावावा. या एक महिन्यात हा प्रश्न मार्गी न लागल्यास पुन्हा एकदा अमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा जरांगे यांनी दिला.

**अन्यथा भव्य सभा घेऊ...**
आजपासून सरकारला एक महिन्याचा वेळ दिला आहे. या एक महिन्यात मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम सरकारने करावे. अन्यथा पुढच्या 12 तारखेला म्हणजेच 12 ऑक्टोंबरला मराठा समाजाची एक मोठी सभा होईल. या सभेत राज्यातील प्रत्येक मराठा सहभागी होईल. देशाच्या इतिहासात कधी नव्हे अशी ही सभा होईल. मराठ्यांचा आक्रोश या निमित्ताने जगाला पाहायला मिळेल. त्यामुळे सरकारला दिलेल्या एक महिन्यात त्यांनी मराठा समाजाला आरक्षण द्यावे, ही अपेक्षा असल्याचे जरांगे म्हणाले.

**वेळ दिला पण उपोषण सुरूच राहणार...**
सरकारला वेळ दिला असला तरी माझे उपोषण सुरूच राहणार असल्याचे जरांगे म्हणाले. मी ज्या ठिकाणी बसलो आहे, त्याच ठिकाणी आरक्षण मिळेपर्यंत बसून राहणार आहे. जोपर्यंत मराठ्यांच्या हातात आरक्षणाचे पत्र येत नाही, तोपर्यंत माझ्या लेकरांचे चेहरा देखील पाहणार नसल्याचे जरांगे म्हणाले आहे.



मुंबईत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर जरांगे यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. सरकारला आम्ही 40 वर्षे दिले. आता ते एक महिना मागत आहे. पण त्यांना वेळ कशासाठी हवी आहे. पण जोपर्यंत मराठा समाजातील प्रत्येकाची हातात आरक्षण पडत नाही, तसे पत्र माझ्या हातात येत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचे जरांगे म्हणाले. आरक्षण मिळेपर्यंत घरी जाणार नाही, उपोषणाच्या ठिकाणाहून उठणार नाही. आरक्षण मिळाल्याशिवाय माझ्या लेकरांचे तोंड पाहणार नाही. सरकार वेळ मागत आहे, पण त्यांना वेळ दिल्यावरही उपोषण मागे घेणार नाही, असे जरांगे म्हणाले आहेत

## हदगावात चौघांचे उपोषण

हदगाव : आरक्षणासाठी सुरू असलेल्या मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून तहसील कार्यालय हदगाव येथे मंगळवारी आत्माराम पाटील वाटेगावकर, राजकुमार भुसारे हदगाव, संदीप शिंदे उंचेगाव, प्रवीण मोरे हरडफ हे चार मराठा बांधव बेमुदत उपोषणास बसले आहेत, तर त्यांना पाठिंबा म्हणून बाजूलाच लाक्षणिक उपोषण सुरू करण्यात आले आहे. ठिकठिकाणी बंद, रास्ता रोको, बेमुदत उपोषण इत्यादी मार्गाने पाठिंबा दर्शविला जात आहे. जोपर्यंत मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू राहील किंवा मराठा आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत आमचेही बेमुदत उपोषण सुरूच राहणार आहे असे उपोषणकर्त्यांनी आधुनिक केसरी शी बोलताना सांगितले. हदगाव येथील दत्ता पाटील हडसणीकर यांचे मागील आठ ते दहा दिवसापासून बेमुदत उपोषण सुरू आहे. चार दिवसांपूर्वीच त्यांना प्रशासनाने तबेत खालावली असल्याने विष्णुपुरीच्या शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नांदेड येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांनी या उपोषणास पाठिंबा जाहीर केला आहे



# कृषी प्रक्रियेला चालना देण्यासाठी आराखडा तयार करा : धनंजय मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठवाडा विभागात कृषी प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मार्फत आराखडा तयार करावा, असे निर्देश कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक कृषीमंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली.



यावेळी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले आणि महाव्यवस्थापक सुजित पाटील, संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या २०२२ - २३ या वित्तीय वर्षाच्या लेख्यांना मान्यता देण्यात आली. मराठवाड्यात सोयाबीन, सिताफळ तसेच इतर कृषी व फळ प्रक्रिया उद्योगाच्या विस्ताराची क्षमता मोठी असून त्याचा सविस्तर अभ्यास करून आराखडा तयार करण्यात यावा. शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त फायदा होण्याच्यादृष्टीने महामंडळाने व्यापक आराखडा करावा असेही निर्देश धनंजय मुंडे यांनी दिले.

# बिडकीन ग्रामपंचायतीत गैरव्यवहार; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र गायकवाड**

**बिडकिन :** पैठण तालुक्यातील सर्वाधिक मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या बिडकिन येथील ग्रामपंचायतमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेतून मिळालेला निधी ६८ लाख २८ हजार ५५० रुपयाचा अपहार केला आहे. याप्रकरणी उद्धव ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख मनोज पेरे यांच्या तत्कालीन सरपंच पत्नी सारिका मनोज पेरे व ग्रामविकास अधिकारी एन.डी. पाडळे यांच्याविरुद्ध दि.११ रोजी बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, बिडकीन ग्रामपंचायत अंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनेअंतर्गत दि.०८मे २०२१ ते १५ मे २०२१ या कालावधी मिळालेल्या मग्रारोहयो रोजगार हमी योजनेअंतर्गत सोमपुरी के मदरसा या रस्त्याच्या कामावर १ लाख २३ हजार व २०२०- २०२१ मध्ये १४ वित्त आयोगातून आलेले ६७,०५,५५० रु जे कि,पेव्हर ब्लॉक, सिमेंट रस्ता, ड्रेनेज लाईन, पंतप्रधान आवास योजना लाभार्थी अहमदखा सरदारखा पठाण यांना लाभ देण्याचे दाखविण्यात आले. मात्र, ऑनलाईन नोंदणी दुसऱ्या लाभार्थ्यांच्या नाव दाखविण्यात आले आहे. या अंतर्गत तत्कालीन सरपंच सारीका मनोज पेरे व ग्रामविकास अधिकारी एन. डी. पाडळे यानी संगणमत करून ६८ लाख २८ हजार ५५० रुपयाचा अपहार केल्याचे चौकशीतून निष्पन्न झाले आहे. यांसह जिल्हा विकास निधी कर्ज अंतर्गत बाधकाम करण्यात आलेले दुकान गाळे मर्जीप्रमाणे वाटप करून साहित्य खरेदी इ. चे निविदा प्रणालीचा वापर न करणे व एकाच दिवशी एकाच पुरवठादाराच्या नावाने वेगवेगळ्या धनादेश देण्यात आले. या संदर्भात जिल्हा परिषद मुख्य अधिकारी यांची कुठलीही परवानगी नाकारत आल्याने संबंधित तत्कालीन ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांनी जमा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ३१/०८/२०१८ ते २५/११/२०१९ पर्यंत चे ग्रामसभा नोंदवही उपलब्ध करून देण्यात आली नाही.वारंवार मागणी करुनही कामा संबधिचे फोटो उपलब्ध करुन देण्यात आले नाही.असा वरिल प्रमाणे शासकिय निधीतील ६८,२८,५५०/- रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी तत्कालीन ग्रामविकास अधिकारी एन.डी. पाडळे व सरपंच सारिका मनोज पेरे यांच्या विरुद्ध विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक पोलिस निरीक्षक गणेश सुरवसे हे तपास करीत आहेत.

# मराठा आरक्षण : युवकाने घेतले विष

## प्रकृती चिंताजनक : शासकीय रुग्णालयात उपचार सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** मराठा आरक्षणासाठी गेल्या आठ दिवसापासून उमरखेड येथील तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु आहे. उपोषण स्थळी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या एका युवकाने विषाचा घोट घेतला. ही घटना आज 12 सप्टेंबर रोजी दुपारी उमरखेड येथे घडली. या प्रकाराने प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली आहे.

अशोक देवराव जाधव वय 35 रा जेवली ता उमरखेड असे विषय प्राशन करणा-या युवकाचे नाव आहे. मराठा आरक्षणासाठी उमरखेड येथे उपोषण सुरु आहे. महिला पुरुष व विद्यार्थी उपोषणकर्त्यांना पाठिंबा देण्यासाठी व राज्य शासनाचा निषेध करण्यासाठी उपोषण स्थळी येत आहे. सलग आठ दिवसापासून सुरू असलेल्या या आमरण उपोषण कर्त्यापैकी एकाची प्रकृती ढासळली असून त्यास उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान आज दिनांक 12 सप्टेंबर रोजी जेवली येथील युवक अशोक देवराव जाधव हा देखील उपोषण स्थळी आला होता. परंतु सदर युवकांने कीटकनाशक प्राशन केले. यावेळी उपस्थितानी मज्जाव केला परंतु तोपर्यंत सदर युवकांनी काही प्रमाणात कीटकनाशक हे विषारी औषध प्राशन केले होते. त्यामुळे त्याला सर्वप्रथम उपजिल्हा रुग्णालय उमरखेड येथे दाखल करण्यात आले होते. येथे त्याच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालय यवतमाळ इथे पाठविण्यात आले. सदर



युवकाला एक दहा वर्षाचा मुलगा असल्याची माहिती मिळाली आहे. या घडलेल्या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी शांततेचे आवाहन केले आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार




किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर




## उगवतीचे रंग


आधुनिक केसरी

'तुम्ही ऐकले असेल की ढाक्याची मलमल इतकी तलम होती की त्याची तयार केलेल्या साडीची घडी एखाद्या आगपेटीत बसेल एवढी लहान होऊ शकायची.हजारो वर्षे या कापडाला जगभरातून पसंती मिळत राहिली. सोळा टप्प्यातून गेल्यानंतर ही मलमल तयार व्हायची. त्याकाळी हा प्रदेश भारतात होता. तेथील मेघना नदीच्या किनाऱ्यावर खास पिकवलेल्या कापसापासून ही मलमल तयार केली जायची. प्राचीन ग्रीसमधील देवतांच्या मूर्तीसाठी ही मलमल वापरली जायची. तसेच अनेक देशातील राजेमहाराजे यांची वस्त्रं त्यापासूनच तयार व्हायची. नेपोलियन बोनापार्टची पहिली पत्नी जोसेफिन ही सुद्धा भारतातील मलमलची अतिशय चाहती होती.

एवढंच नव्हे तर पुढे जे मोगल आक्रमक भारतात आले आणि सत्ताधीश झाले, त्यांची वस्त्रेही याच तलम अशा मलमलीपासून बनवली जायची. संपूर्ण जगाला या मलमलने वेड लावलं होतं, पूर्वी शाही दरबारात जे कवी होते, ते ढाक्याच्या मलमलीला ' बफत हवा ' म्हणजे ' विणलेली हवा ' असं म्हणत इतकं ते वजनानं हलकं असायचं. अर्थात हे कापड अत्यंत महाग असायचं. ज्यांची ते परिधान करण्याची ऐपत असायची असेच लोक हे कापड वापरायचे. हे कापड इतकं तलम आणि पारदर्शक होत की त्यातून शरीर दिसायचं. हे कापड म्हणजे आशिया खंडातील एक चमत्कार समजला जाई. परदेशातील काही पर्यटकांना तर ते कापड हाताने तयार केलं आहे यावर विश्वासच बसत नसे. त्यांना वाटे की हे कापड भूत किंवा पऱ्या तयार करतात. हे कापड इतके तलम असे की एकावर एक असे त्याचे थर घातले तरी त्यातून शरीर दिसत असे. औरंगजेबाच्या दरबारातील एक हकीगत याबाबत सांगितली जाते. एकदा औरंगजेबाची मुलगी हे वस्त्र परिधान करून दरबारात आली. तिने एकावर एक असे सात थर किंवा पदर या कापडाचे घातले होते. तरी औरंगजेब तिच्यावर रागावला होता.' तुम्हाला या मलमलच्या कापडाची किंमत सांगितली तर आश्चर्य वाटेल. एक फूट मलमलच्या कापडाची किंमत १८५१ मध्ये ५० ते ४०० पौंडाच्या दरम्यान म्हणजे अंदाजे ५००० ते ४०००० रुपये इतकी असायची. ' भगवानराव म्हणाले. ते ऐकून सगळ्यांनी आश्चर्याने तोंडात बोटे घातली. भगवानराव पुढे म्हणाले. आपण कापड मीटरमध्ये मोजतो. पूर्वी ते ' गज ' मध्ये मोजले जायचं बरं का ! " गज ' म्हणजे किती हो भाऊजी ? ' श्यामलाताईंनी विचारले.



## स्वयंपूर्ण ग्रामीण भारत



## आनंदी पहाट

# शरीर हे भोग नव्हे; तर योगसाधनेचे माध्यम

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपलं शरीर आणि अंतर्गत इंद्रिये यांच्यापेक्षाही आपलं मन अधिक महत्त्वाचं असतं. ज्ञानेंद्रिये माहिती गोळा करतात. ती माहिती मेंदूमध्ये साठवली जात असते. त्या माहितीचा अर्थ लावण्याचं काम, तिचं मूल्यमापन करण्याचं काम मन करत असतं. म्हणूनच आपल्याला प्रत्येक गोष्टीची जाणीव होत असते. आपल्याला ह्या जगात कोणतीही गोष्ट फुकट मिळत नाही. आपले शरीर मात्र याला अपवाद आहे. कारण ते आपल्याला फुकट मिळालेलं आहे. कदाचित त्यामुळेच शरीराची काळजी न घेता आपण फुकटचं आजारपण ओढवून घेत असतो. आयुष्यात अनेक गोष्टी पुनःपुन्हा मिळू शकतात, परंतू आपलं शरीर मात्र पुन्हा मिळत नाही. म्हणूनच त्या शरीराची काळजी घेणं जरुरीचं असतं. योग ही एक जीवनपद्धती असून, ती पुरातन काळापासून भारतात प्रचलित आहे. योग हा मुळात अध्यात्मिक प्रचितीकरिता केला जातो. योगामुळे मनःशांती तर प्राप्त होतेच, त्याचप्रमाणे शारीरिक, मानसिक स्वास्थ्यसुद्धा लाभते. योगासन, प्राणायाम, ध्यान, सूर्यनमस्कार, श्वसनाचे प्रकार ह्या सर्व प्रक्रिया शरीराच्या माध्यमातूनच कराव्या लागतात. ह्या सर्वांच्या सरावानं मन, शरीर व श्वास ह्या गोष्टी एका लयीत येण्यास मदत होत राहते. शरीर सुस्थितीत असेल तरच योग साधना चांगली होऊ शकते. शरीर हे योग साधनेचं माध्यम असल्याची जाणीव आपण करून घेतली पाहिजे. आपल्या प्रत्येकाला प्रकृतीची काळजी घेणं जरुरीचं असतं. त्यासाठी आवश्यक ती पथ्य पाळणे देखील आवश्यक असतं. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या व्यग्र आणि व्यस्त दिनक्रमांत आपण दीनदुबळ्या अवस्थेलाच निमंत्रित करत असतो, हे नेहमीच विसरतो, अथवा त्याची जाणीव आपल्याला त्यावेळी होत नाही.



## हरि बोले वाचे | पार्थ माझा ||

सुखाचे साधन | सांगे संतजन ||
हरिनामावीन | नाही दुजे ||१||
नामासंगे कर्म | कर्मासंगे भक्ती ||
नांदे सुख शांती | ज्ञानामध्ये ||२||
ज्ञानियांच्या अंगी | असावा संयम ||
अंतरीचा राम | जागवावा||३||
क्षमाशील वृत्ती | क्रियाशील मन ||
शुद्ध अंतःकरण | भाग्यवंता||४||
सुख दुःख दोन्ही | सम झाले ज्याचे ||
हरि बोले वाचे | पार्थ माझा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

दूरीकुरुश्व मे तापान् वृषभध्वजवल्लभे | धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् || ८८ || वृषभ ज्यांचे वाहन आहे, अशा भगवान श्री महादेवाच्या प्रिये, माझे ताप दूर कर. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

देव दैव नक्षत्र नय, भूत भुगर्भ विज्ञान ।
चौदह चौसठ की कला, मधुविद्या सब
खान ।।१३।।(स्ववेंद चतुर्थ मण्डल प्रथम
अध्याय) ०४/०१/१३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
देवविद्या, दैवविद्या, क्षत्र, नक्षत्र, भूतविद्या, भूगर्भविद्येचे विज्ञान तसेच चौदा विद्या आणि चौसष्ठ कलांचा आत्मा ब्रह्मविद्या आहे.




स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सिध्दलक्षण

आधुनिक केसरी





सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


मित्रांनो सिध्दलक्षणांचा कितीही अभ्यास केला तरी स्वस्वरूपाशी तदाकार झाल्या शिवाय व स्वस्वरूप बनून राहिल्या शिवाय साधकावस्था प्राप्त होत नाही. आपली वृत्ति निर्गुण स्वरूपाच्या ठिकाणी रहाणे ही परमार्थाच्या साधनांची पराकाष्ठा असते.वृत्ती त्रिगुणातीत परमात्मस्वरूपात रहाणे ही साधन अभ्यासाची पहिली पायरी आहे .सतत संतांचा, वेदांचा अभ्यास करणे,संत विचारांवर जगणे,पराकोटीची अलिप्तता अंगी मुरवणे,काम,क्रोध,लोभ मत्सर,सर्वांपासून अलिप्तता ही साधक बनण्याची सुत्रे आहेत. जप माळ हातात,तोंडांत रामनाम पण मनात दुसरें विचार असे होऊ देऊ नये.

साधूंची लक्षणे ज्यांच्या कल्पनेमध्ये केवळ स्वस्वरूपाचा भरून रहाते तेथे कोणतीही इच्छा किंवा कामना उतरू शकत नाही. जो निष्काम कर्मयोगी असतो तो साधू होऊ शकतो. एखादी वस्तू मिळाली नाही तर माणूस स्वभावात असल्याने राग येतो.

## भगवंताकडे मन लावावे

आधुनिक केसरी

खरोखर, प्रारब्धाचे भोग कुणालाही टळत नाहीत. प्रारब्धाचा संबंध देहापर्यंतच असतो, मनाशी नाही. देहास सुखदुःख प्रारब्धाने मिळते. दुःख कोणालाही नको आहे, पण ते येते. सुखाचेही तसेच आहे. प्रारब्ध म्हणजे कृतकर्माचे फळ. हे चांगले वा वाईट असू शकते. सुखाचे भोग आले तर माणसाला काही वाटत नाही, पण दुःखाचे प्रसंग आले की मनुष्य म्हणतो, "मी देवाचे एवढे केले, मी अमक्या अमक्या सत्पुरुषाचा आहे, मग मला असे दुःख का भोगावे लागते ?" पण त्याला हे समजत नाही की हा सर्व आपल्याच कर्माचा परिणाम आहे. त्याला देव किंवा संत काय करील ? समजा, आपल्याला काही पैशाची जरूरी आहे आणि आपल्या ओळखीचा माणूस किंवा अगदी जवळचा नातेवाईक एखाद्या मोठ्या बँकेचा मनेजर आहे; पण आपल्या स्वतःच्या नावावर बँकेत जर पैसे नसले तर तो काहीही करू शकत नाही. फारच झाले तर तो आपल्या स्वतःच्या खिशातून काही पैसे देईल. त्याचप्रमाणे, आपल्या प्रारब्धात जर सुख नसेल तर ते कुठून मिळणार ? संत फार तर जरूरीप्रमाणे आपले दुःख स्वतः सोसून आपला भार हलका करील इतकेच. म्हणून आपल्या प्रारब्धाने आलेल्या बऱ्यावाईट गोष्टी देहाने भोगाव्या आणि मनाने भगवंताचे स्मरण ठेवावे. खरा भक्त हा देहाला विसरलेला असल्याने देहाचे भोग भोगणे वा न भोगणे या दोन्हीची त्याला फिकीर नसते. म्हणून तो भोग टाळत नाही. मनुष्याच्या देहाच्या अवयवात जसा कमीजास्तपणा असतो, त्याचप्रमाणे मनुष्याचे विकार आणि गुण पूर्वजन्माच्या संस्काराप्रमाणे, म्हणजेच प्रारब्धाप्रमाणे, कमीजास्त प्रमाणात येतात. आपल्या देहाला होणारे भोग आपल्या कर्माचेच फळ असते, पण ते अमुक कर्माचे फळ आहे असे कळत नसल्यामुळे आपण त्याला प्रारब्ध असे नाव देतो. जगातल्या घडामोडी जशा चालतात, तशाच आपल्या सर्व गोष्टी प्रारब्धानेच चालतात. आपल्याला येणाऱ्या आपत्ती आपल्या प्रारब्धाच्या असतात; त्या भगवंताच्या नसतात; त्या पाहुण्यासारख्या असतात. त्या जशा येतात तशा जातात देखील. आपण होऊन त्या आणू नयेत, आणि प्रारब्धाने आल्या तर त्यांना घाबरू नये. प्रारब्धाची आणि ग्रहांची गती देहापर्यंतच आहे, मनाने भगवंत भजायला त्यांची आडकाठी नाही. जो संताची किंवा सद्गुरूची आज्ञा पाळतो, त्याचे प्रारब्ध हे प्रारब्धरूपाने राहात नाही. भगवंताच्या अनुसंधानाची सवय लावून घ्यावी, म्हणजे आपण प्रारब्धावर विजय मिळवल्यासारखेच आहे.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

सर्व साधारण पणे जीव हा कोणाच्या तरी साह्यानेच प्रगती करत असतो त्या मध्ये ग्रंथ हि मोठी भूमिका वठवतात ग्रंथातील विचार प्रगती कडेच नेतात. येथे सर्व श्रेष्ठ आपण त्या ग्रंथाला म्हणू कि ज्या ग्रंथाने माझ्या जीवनाला एक उत्कृष्ठ वळण दिले व त्यानेच मी आज येथे आहे .ग्रंथ हे गुरु आहेत मग ग्रंथ आयुष्याला वळण देऊ शकतो कि नाही ? जो ग्रंथ माझे आयुष्यच उत्कृष्ठ करतो तोच माझा उत्कृष्ठ ग्रंथ. मी सतत त्या ग्रंथाला मनाच्या मुलामय अशा बिछान्यावर सतत प्राणासमान जपतो त्याची काया वाचा मने पूजा करतो हा ग्रंथ मी नित्य वाचतो मनन करतो . त्यात लिहलेले सर्व हेच माझे जीवन मी त्या प्रमाणे वागण्यास बांधील आहे म्हणून मला आज हे सुंदर दिवस आले आहेत आणि माझ्या या ग्रंथावर असलेल्या श्रद्धेमुळेच माझी व माझ्या दिक्षा गुरु मधील अंतर कमी झाले व मला ह्या ग्रंथानेच गुरुंचा अनुग्रह होण्याचा मार्ग मोकळा केला व मला लायक केले .

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

येतो जातो वेळोवेळां ।न कळे कळा सांपडती ॥२॥
तुका म्हणे धरा ठायींच्या ठायीं ।मिठी जीवीं पायीं घालुनियां ॥३॥जीवशिवाच्या मांडूनि हाला ।अहं सोहं दोन्ही भेडती भला ॥१॥घाली हुतुतू फिरोनि पाही आपुणासि ।पाही बळिया तो मागिला तुटी पुढिलासि खेळिया तो हाल सांभाळी ।धुम घाली तो पडे पाताळीं ॥२॥बळिया गांढ्या तो चि खेळे ।दम पुरे तो वेळोवेळां खेळे ॥३॥
हातीं पडे तो चि ढांग ।दम पुरे तो खेळिया चांग ॥४॥
मागें पुढें पाहे तो जिंके ।हातीं पडे तो चि आधार फिके ॥५॥
आपल्या बळें खळे रे भाई ।गडियाची सांडोनि सोई ॥६॥
तुका म्हणे मी खेळिया नव्हें ।जिकडे पडें त्याचि सवें ॥७॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १३ सप्टेंबर २०२३




पोळा माझ्या माहेरचा...

पान ६



कावडयात्रा, तरुणाई आणि श्रावणमास

पान ७

# भाजपाने गरिबांचा घास हिरावून घेण्याचे पाप केले

## नाना पटोले : जनसंवाद यात्रा संविधान, लोकशाही व देश वाचवण्याची लढाई

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** केंद्रात व राज्यातील भाजपा सरकार सर्वसामान्य जनता व गरिबांच्या हिताचे नाही. काँग्रेसचे सरकार असताना रेशनवर गहू, तांदूळ, डाळ, डालडा, तेल, साखर मिळत होते पण भाजपाच्या राज्यात रेशनवर धान्यच मिळत नाही. देशात गरीब लोक राहिले नाहीत असे केंद्र सरकार म्हणत आहे. मोदी सरकारने गरीब कुटुंबाला उज्ज्वला गॅस दिला आणि केरोसिन बंद केले, सरकारच्यामते ज्यांच्या घरी गॅस सिलिंडर आहे तो गरीब नाही आणि या लोकांना रेशनवरील डाळ, तेल, साखर, तांदूळ सर्व बंद करुन टाकले. रेशनचे धान्य बंद करुन भाजपा सरकारने गरिबांच्या तोंडातील घास हिरावून घेण्याचे पाप केले आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यंनी केला आहे.

जनसंवाद यात्रेच्या आजच्या १० व्या दिवशी नाना पटोले यांनी भंडारा जिल्ह्यातील लाखनी शहरातील पदयात्रेत सहभाग घेतला व दुपारी सभा घेतली. त्यानंतर झेंडा चौक, सेंदुरवाफा येथून जनसंवाद



यात्रेला सुरुवात झाली व संध्याकाळी जुनी पंचायत समिती परिसर, साकोली येथील जाहीर सभेला संबोधित केले. जनसंवाद यात्रेतील सभेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचे सरकार शेतकरी विरोधी, व्यापारीविरोधी, गरिबांच्याविरोधी सरकार आहे. शेतकऱ्यांच्या शेतात डाळ पिकते त्यावेळी डाळीला भाव नसतो आणि तीच डाळ अदानीच्या गोडाऊनमध्ये गेली की १७० रुपये किलो होते. दुकानातून कोणतीही वस्तू खरेदी करा त्यावर आपल्याला जीएसटी द्यावा लागतो. राज्यातील हिटलर सरकार शेतकऱ्यांनी वीजबिल भरले नाही तर कनेक्शन तोडते. उन्हाळी धानाचे पैसे अजून मिळाले नाहीत. आठ दिवसात पैसे देण्याचा नियम आहे पण सरकारने शेतकऱ्यांचा तीन-चार महिने दैसे दिले नाहीत. गरजेच्या वेळी शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत, त्याचा उपयोग काय? खतांच्या किमती दुप्पट केल्या व खतांचे पोते ५० किलोऐवजी ४५ किलोचे केले. खतांची लिंकिग करुन शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. शेतीला लागणारा टॅक्टर घ्यायचा असेल तर त्यावर १८ टक्के जीएसटी द्यावा लागतो आणि कार खरेदी करायची असेल १२ टक्के जीएसटी द्यावा लागतो. भाजपा सरकार आल्यापासून देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, गृहिणींच्या आत्महत्या वाढल्या आहेत, तरुणांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. भाजपाच्या राज्यात मरण स्वस्त झाले आहे, लोकांनी आत्महत्येचा मार्ग पत्करु नये, काँग्रेस तुमच्यासोबत आहे. जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून जनतेचे दुःख, वेदना, समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न आहे. जनसंवाद यात्रा खुर्चीच्या लढाईसाठी नाही तर लोकशाही, संविधान व देश वाचवण्याची लढाई आहे, ही लढाई आपण मिळून लढू व देश, लोकशाही व संविधान वाचवू, असे आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले.

काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यात जनसंवाद यात्रा उत्साहात पार पडली. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या खिरोदा गावातील त्यांच्या स्मृतींना थोरात यांनी अभिवादन केले. उत्तर महाराष्ट्रात जनसंवाद यात्रेला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद. विधान परिषदेतील गटनेते सतेज बंटी पाटील यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील सुपात्रे येथील हनुमान मंदिरापासून पदयात्रेला सुरुवात केली. यामध्ये महिला, युवक व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बांबवडे येथील राधाकृष्ण मंगल कार्यालयात झालेल्या संवाद सभेसाठीही नागरिकांची मोठी गर्दी केली होती. माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी तिवसा मतदारसंघात जनसंवाद यात्रेदरम्यान शेतकऱ्यांशी, शेतमजुरांशी संवाद साधला. यात्रेत कलावतीबाई बांदुरकर देखील सहभागी झाल्या होत्या. काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेला राज्यभर जनतेने चांगला प्रतिसाद दिला.



## उलगुलान कामगार संघटनेचे साखळी उपोषण

### कामगार पीएफ चोरांवर गुन्हा दाखल होणार काय ?

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आश्वासनांची पूर्तता न केल्याने उलगुलान कामगार संघटनेने वीज केंद्र प्रशासन व कुणाल कंपणीविरोधात मेजर गेटसमोर आज  मंगळवार पासून साखळी उपोषण सुरू केले आहे. मागील कित्येक वर्षांपासून कुणाल कंपनीत कंत्राटी कामगार काम करत आहेत. मात्र त्यांचे वेतन नियमित होत नाही, त्यांचे भविष्य निर्वाह निधी कापल्या जात नाही, कुशल कामगारांना वेतन वाढ दिल्या जात नाही, इतकेच नव्हे तर कुणाल कंपनीच्या ठेकेदाराकडून कामगारांना कामावरून काढून टाकण्याची वारंवार धमकी सुद्धा दिल्या जाते.

या सर्व बाबी कामगार आयुक्त, जिल्हाधिकारी, वीज केंद्राचे मुख्य अभियंता यांना वारंवार निदर्शनास आणून दिल्या.मात्र कंपनीवर अजूनही कुठलीही कारवाई करण्यात आली नाही.

या सर्व प्रकारामुळे कामगारांच्या मानसिकतेचे खच्चीकरण होत असून  कामगारांचे वेतन वेळेत देण्यात यावे, भविष्य निर्वाह निधी कपात करण्यात यावा, कामगारांना वेतन वाढ देण्यात यावी यासह इतर मागण्यांना घेऊन 5 सप्टेंबर पासून आंदोलनाचा इशारा देण्यात आला. होता. आंदोलनाचा धसका घेत वीज केंद्र प्रशासन व कुणाल कंपनीच्या व्यवस्थापनाने कामगार संघटनेची बैठक घेतली. या बैठकीत कामगारांच्या मागण्या मान्य करत असल्याचे लेखी आश्वासन सुद्धा देण्यात आले.

मात्र अजूनही मागण्यांची पूर्तता न केल्याने आज मंगळवार पासून मेजर गेट समोर साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. यावेळी उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे, रवि पवार,पवन भगत, नंदलाल वर्मा,गुरु भगत,कुणाल चौधरी, सुमित भिमटे,मगेश बदकल,अक्षय राउत,अभय सपाट,अमर गोलटकर, शाम चुके,मोनू मटाले,प्रतीक मानकर, प्रफुल्ल सोनट्टके, प्रवीण मंडावी,सुधीर डाहाकी,आंनद पुणेकर,राजु जगने, प्रदीप झामरे,प्रफुल्ल पाटिल, राहुल वाभले आदि उलगुलान कामगार उपस्थित होते.

## फडणवीस, बावनकुळे यांचा अवमान केला तर त्याच भाषेत उत्तर : चित्रा वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर हीन भाषेत टीका केल्यास उद्धव ठाकरे व त्यांच्या चेल्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल असा खणखणीत इशारा भाजपा  महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ यांनी मंगळवारी  दिला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले, महिला मोर्चा प्रदेश कार्यकारिणी सदस्य मृणाल पेंडसे, भाजपा प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान यावेळी उपस्थित होते. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर वर्णद्वेषी भाषेत टीका करून भास्कर जाधव यांनी समस्त ओबीसी समाजाचा अपमान केला आहे. या बद्दल जाधव यांनी ओबीसी समाजाची माफी मागावी, अशी मागणीही श्रीमती वाघ यांनी केली.

श्रीमती वाघ म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली जी-२० परिषदेची यशस्वी सांगता झाली. असे असताना उद्धव ठाकरे आणि त्यांच्या चेल्यांनी भाजपाच्या नेत्यांचा खालच्या स्तरावर जाऊन अवमान करण्याची स्पर्धाच लावली आहे. स्वतःच्या नाकर्तेपणामुळे आज उद्धव  ठाकरे यांची अवस्था करमणूक करणाऱ्या विदुषकासारखी झाली आहे असे श्रीमती वाघ म्हणाल्या. विदुषक निदान निखळ मनोरंजन तरी करतात पण हे कामदेखील श्री. ठाकरे आणि त्यांच्या टोळीला जमत नाही अशी कोपरखळी त्यांनी मारली. महिला मोर्चा तर्फेठाकरे यांना विदुषकाचा पोषाख पाठवत असून हा पोषाख पाहून ठाकरे यांना आपण केवळ करमणुकीपुरते उरलो आहेत याची जाणीव होईल असेही त्या म्हणाल्या.






## किम जोंग-उन रशियात; अमेरिकेची चिंता वाढली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** नुकत्याच पार पडलेल्या जी २० शिखर परिषदेमध्ये जगभरातल्या प्रभावशाली राष्ट्रांच्या प्रमुखांची बैठक पार पडली. या परिषदेमध्ये रशिया-युक्रेन युद्धाविषयीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. यावर रशियासह सर्व सदस्य राष्ट्रांनी मंजुरीची मोहोर उमटवली. युक्रेन युद्धाचे जगावर झालेले परिणाम यात अधोरेखित करण्यात आले होते. मात्र, एकीकडे पुतिन यांनी या परिषदेला येणे टाळल्यानंतर आता ते रशियात उत्तर कोरियाचे हुकुमशाह किम जोंग-उन यांची भेट घेणार आहेत. या भेटीत शस्त्रास्त्रांविषयी वाटाघाटी होणार असल्याची जोरदार चर्चा असल्यामुळे यामुळे अमेरिकेची चिंता वाढली आहे.

जपानी माध्यमांच्या हवाल्याने रॉयटर्स वृत्तसंस्थेनं दिलेल्या वृत्तानुसार, किम जोंग-उन यांनी रविवारी प्योंगयांग स्थानकावरून त्यांच्या खासगी रेल्वेनं रशियाच्या दिशेनं आपला प्रवास सुरू केला. यावेळी किम जोंग-उन यांच्यासमवेत देशातील काही मोठे शस्त्रास्त्र निर्मिती करणारे उद्योगपती व उत्तर कोरियाचे परराष्ट्रमंत्रीही होते. ही रेल्वे सोमवारी रशियातील खासान रेल्वे स्थानकात दाखल झाली. दक्षिण कोरियाच्या संरक्षण विभागाच्या प्रवक्त्यांनीही या वृत्ताला दुजोरा दिला आहे. अमेरिकेनं रशिया व उत्तर कोरिया यांच्यातील लष्करी वाटाघाटींना तीव्र विरोध केला होता. अशा प्रकारची कोणतीही चर्चा रशियाने उत्तर कोरियाशी करू नये, असा इशाराही अमेरिकेने दिला होता. मात्र, तरीही किम जोंग-उन व व्लादिमिर पुतिन यांच्यात वाटाघाटी होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे अमेरिकेच्या चिंता वाढू शकतात.

# पुन्हा भारत जोडो यात्रा

आधुनिक केसरी

भारत जोडो यात्रेचा पहिला टप्पा याच वर्षी जानेवारी महिन्यात संपला. कन्याकुमारीपासून सुरु झालेली ही यात्रा काश्मीरमध्ये संपली. आता भारत जोडो यात्रेचा दुसरा टप्पा सुरु होतो आहे. लवकरच हा टप्पा सुरू होणार असून राहुल गांधी यांच्या नेतृत्वातच ही यात्रा निघणार आहे. मुंबई काँग्रेसने ट्विट करून याविषयीची माहिती दिली आहे. राहुल गांधींची ही यात्रा अरूणाचल प्रदेश ते महाराष्ट्र अशी असणार आहे. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेच्या पहिल्या टप्प्यात 'मोहब्बत की दुकान'चा नारा दिला होता. आता दुसऱ्या टप्प्यात ते काय नारा देणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.भारत जोडो यात्रेचा दुसरा टप्पा सुरू होण्याआधी विरोधकांची आघाडी तयार झाली आहे. या आघाडीला इंडिया हे नाव देण्यात आलं आहे. इंडिया आघाडीच्या तीन बैठकाही पार पडल्या आहेत. पहिली बैठक पाटणा, दुसरी बंगळुरू तर तिसरी बैठक मुंबईत पार पडली आहे. तसेच या बैठकीत २७ पक्ष मोदींच्या विरोधात एकत्र आले आहेत. भारत जोडो यात्रा सुरू होण्याआधीच मणिपूरचे गंभीर प्रकरण घडून गेले आहे. तसंच पावसाळी अधिवेशनही पार पडले आहे. त्याचप्रमाणे राहुल गांधी यांची गेलेली खासदारकीही त्यांना परत मिळाली आहे. या सगळ्या मुद्द्यांचा समावेश या यात्रेत होऊ शकतो. इंडिया हे नाव विरोधकांच्या आघाडीला दिल्यानंतर आता चर्चा सुरू झाली आहे ते इंडिया नाव जाऊन भारत हे नाव येण्याची. अशात काँग्रेसने जुडेगा भारत जितेगा इंडिया हा नारा दिला आहे. या नव्या नाऱ्याचे पडसादही नव्या टप्प्यात पाहण्यास मिळतील. तसेच विशेष अधिवेशनात सरकारने भारत हे नाव ठेवले तर त्यावरूनही राहुल गांधी आणि काँग्रेस नेते टीका करण्यास सज्ज होतील. राहुल गांधींच्या दुसऱ्या टप्प्यातील भारत जोडो यात्रेची सुरुवात झाल्यानंतर महाराष्ट्रातही आम्ही पदयात्रा काढणार आहोत. पूर्व विदर्भात माझ्या नेतृत्वात पदयात्रा काढली जाणार आहे. तर पश्चिम विदर्भात आमचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार पदयात्रा काढणार आहेत. उत्तर महाराष्ट्रात बाळासाहेब थोरात, मराठवाड्यात अशोक चव्हाण, पश्चिम महाराष्ट्रात पृथ्वीराज चव्हाण आणि मुंबईत वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पदयात्रा निघणार आहे. कोकणातील पदयात्रेत आमच्या पक्षाचे सर्वच नेते सहभागी होतील. असे आमच्या पदयात्रेचे नियोजन आहे, अशी माहितीही नाना पटोले यांनी मागच्या महिन्यात दिली होती.

# जी २० देशांमध्ये एकमत



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**दिल्लीत संपन्न झालेल्या दोन दिवसीय G20 शिखर परिषदेत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. याच काळात भारत मध्य पूर्व युरोप दरम्यान कनेक्टिव्हिटी कॉरिडॉरही सुरू करण्याबाबत उपस्थित देशांनी सहमती दर्शविली. जी-२० सदस्य राष्ट्रांच्या शिखर परिषदेत भारत, पश्चिम आशिया व युरोप यांना जोडणारी एक दळणवळण मार्गिका (कनेक्टिव्हिटी कॉरिडॉर) लवकरच सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पात भारतासह संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, युरोपियन संघ, फ्रान्स, इटली, जर्मनी व अमेरिका अशा महत्त्वाच्या देशांचा यात समावेश आहे. व्यापारासाठी दळणवळण आणि पायाभूत सुविधांमधील सहकार्याच्या दृष्टीने हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. शनिवारी (९ सप्टेंबर २०२३) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दळणवळण मार्गिकेची (कनेक्टिव्हिटी कॉरिडॉर) घोषणा केली.**


त्यांनी केलेल्या घोषणेनुसार भारत, पश्चिम आशिया आणि युरोपाला जोडण्याचा या मार्गिकेच्या माध्यमातून प्रयत्न केला जाणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पश्चिम आशिया आणि युरोपला रेल्वेमार्ग तसेच बंदरांच्या माध्यमातून जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यामध्ये डिजिटल कनेक्टिव्हीटी प्रस्थापित करणे तसेच या प्रकल्पात सहभागी असणाऱ्या देशांमध्ये व्यापार वाढवण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे. ग्रीन हायड्रोजनसारख्या उर्जा निर्मितीसाठी कामाला येणाऱ्या अन्य बाबींचीही देवाणघेवाण या प्रकल्पाच्या माध्यमातून सुरळीत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या प्रकल्पाला 'इंडिया-मिडल ईस्ट-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर'(IMEEEC) असे नाव देण्यात आले आहे. या प्रकल्पाला 'स्पाईस रुट' म्हटले जात आहे. तसेच चीनकडून राबवल्या जाणाऱ्या बेल्ट अँड रोड इनिशिएटीव्हला (बीआरआय) पर्याय म्हणूनही या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे. या प्रकल्पांतर्गत भारत आणि युरोपला जोडण्यासाठी पश्चिम आशियाई देशांतून रेल्वेजाळे निर्माण करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची मोदी यांनी घोषणा केल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनीदेखील या प्रकल्पावर भाष्य केले. यावेळी सौदी अरेबियाचे राजे आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलाम अल साऊद, युरोपीयन संघाचे अध्यक्ष उरसुला वोन डेर लेयेन आदी जागतिक नेत्यांनी प्रकल्पाचे स्वागत केले.

G-20 परिषदेच्या पहिल्या दिवशी, भारताने भारत-मध्य पूर्व-युरोप कॉरिडॉरच्या बांधकामाची घोषणा केली. मध्यपूर्व आणि युरोपीय देशांव्यतिरिक्त अमेरिकाही या प्रकल्पात महत्त्वाचा भागीदार आहे. बीआरआयला चीनचे उत्तर म्हणून या कॉरिडॉरकडे पाहिले जात आहे.जी २० देशांनी चीनच्या विस्तारवादी धोरणाला आळा घालण्यासाठी दिल्ली जाहीरनाम्या द्वारे जोरदार प्रत्युत्तर दिले.

सध्या चीन 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' तसेच 'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरडॉर' हे दोन प्रकल्प राबवत आहे. जागतिक पातळीवर व्यापाराला गती यावी, यासाठी चीनकडून हा प्रयत्न केला जात आहे. चीनच्या या प्रयत्नांना उत्तर म्हणून IMEEECकडे पाहिले जात आहे.

या करारामुळे जगभरातील कनेक्टिव्हिटी आणि विकासाला शाश्वत दिशा मिळेल.




मजबूत कनेक्टिव्हिटी आणि पायाभूत सुविधा हा मानवी सभ्यतेच्या विकासाचा मूलभूत पाया आहे. भारताने आपल्या विकासाच्या प्रवासात या विषयाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.या प्रकल्पाच्या संदर्भात पीएम मोदी म्हणाले की, आमचा विश्वास आहे की विविध देशांमधील संपर्क केवळ व्यापार वाढवत नाही तर त्यांच्यातील विश्वास देखील वाढतो. कनेक्टिव्हिटी उपक्रमांना चालना देऊन, आम्ही तत्त्वज्ञानाला चिकटून आहोत याची खात्री करणे आवश्यक आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन करणे, सर्व देशांच्या सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर करणे समाविष्ट आहे. हा प्रकल्प त्याच्या दोन मार्गांद्वारे राष्ट्रांमधील मोठ्या आर्थिक एकात्मतेचा टप्पा सेट करतो, ज्यात समाविष्ट आहेः पूर्व कॉरिडॉर, जो भारताला अरबी आखाताशी जोडतो आणि उत्तरी कॉरिडॉर, जो अरबी आखाताला युरोपशी जोडतो. वस्तू आणि सेवांची सुरळीत हालचाल सुलभ करण्यासाठी डिझाइन केलेल्या या कॉरिडॉरमध्ये रेल्वे आणि शिपिंग मार्ग असतील, जे डिजिटल आणि वीज केबल नेटवर्कवर आधारित असतील.

बिडेन यांनी आयएमईसीचे महत्त्व सांगितले अमेरिकेचे अध्यक्ष जो बिडेन यांनी IMEC च्या जागतिक महत्त्वावर भर दिला. त्यांनी 'एक मोठी उपलब्धी' म्हणून त्याचे स्वागत केले आणि आगामी दशकात 'इकॉनॉमिक कॉरिडॉर' या शब्दाला महत्त्व प्राप्त होईल असे भाकीत केले. अंगोला ते हिंदी महासागरापर्यंत पसरलेल्या नवीन रेल्वे मार्गावर गुंतवणूक करून कनेक्टिव्हिटी वाढविण्याच्या अमेरिकेच्या वचनबद्धतेवर त्यांनी प्रकाश टाकला. हा प्रकल्प रोजगार निर्माण करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर अन्न सुरक्षा वाढवण्यासाठी गेमचेंजर ठरू शकेल, असा विश्वास बिडेन यांनी व्यक्त केला.ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट (PGII) साठी भागीदारी अंतर्गत स्थापित, जी 7 देशांनी प्रोत्साहन दिले, या कॉरिडॉरचे उद्दिष्ट चीनच्या बेल्ट अँड रोड (BRI) उपक्रमाला जोरदार प्रतिसाद देणे आहे. उदयोन्मुख देशांमधील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वित्तपुरवठा करण्यासाठी PGII द्वारे समर्थित G7 च्या सामूहिक प्रयत्नांमुळे भागीदार देशांमधील व्यापार वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण ऊर्जा उत्पादनांसह जागतिक आर्थिक संबंध अधिक दृढ होतील. युरोपियन युनियनचे अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांनी त्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की कॉरिडॉरमुळे प्रवासाचा कालावधी 40% कमी होईल. 'भारत, मध्य पूर्व आणि युरोपमधील सर्वात थेट संबंध' असे त्यांनी त्याचे वर्णन केले. दरम्यान, सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स आणि पंतप्रधान मोहम्मद. बिन सलमानने हा परिवर्तनवादी उपक्रम प्रत्यक्षात येण्यासाठी उत्सुकता व्यक्त केली

या प्रकल्पाला मोदींनी आर्थिक एकात्मतेचे प्रभावी माध्यम म्हंटले. आज आपण सर्वांनी एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक करार संपन्न होत असल्याचे पाहिले आहे. आगामी काळात भारत, पश्चिम आशिया आणि युरोपमधील आर्थिक एकात्मतेचे ते प्रभावी माध्यम असेल. यामुळे जगभरातील कनेक्टिव्हिटी आणि विकासाला शाश्वत दिशा मिळेल. मजबूत कनेक्टिव्हिटी आणि पायाभूत सुविधा हा मानवी सभ्यतेच्या विकासाचा मूलभूत पाया आहे. भारताने आपल्या विकासाच्या प्रवासात या विषयाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

आज आपण सर्वजण एका महत्त्वाच्या आणि ऐतिहासिक कराराचे साक्षीदार झालो आहोत. आगामी काळात ते भारत, पूर्व आशिया आणि युरोपमधील आर्थिक एकात्मतेचे प्रभावी माध्यम बनेल. यामुळे संपूर्ण जगाला कनेक्टिव्हिटी आणि विकासासाठी एक शाश्वत दिशा मिळेल. आम्ही ग्लोबल साउथच्या अनेक देशांमध्ये विश्वासू भागीदार म्हणून ऊर्जा, रेल्वे, पाणी, तंत्रज्ञान पार्क या क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधा प्रकल्प राबवले आहेत. या प्रयत्नांमध्ये आम्ही मागणीवर आधारित आणि पारदर्शक दृष्टिकोनावर विशेष भर दिला आहे.

विशेष म्हणजे IMEC प्रकल्प, ज्याची मे 2023 च्या सुरुवातीस चर्चा झाली, कनेक्टिव्हिटीमध्ये क्रांती घडवून आणणे, भारत-पाकिस्तान संबंधांमधील विद्यमान अडथळे दूर करणे आणि युरोप आणि पर्शियन गल्फ राज्यांमधील रेल्वे कनेक्टिव्हिटी सुलभ करणे हे उद्दिष्ट आहे. इस्त्रायलपर्यंत विस्तारित करण्याची कल्पना आहे, शक्यतो भविष्यात. IMEC द्वारे जहाज आणि रेल्वे मार्ग चालवणे अनेक उत्पादनांसाठी एक महत्त्वपूर्ण हालचाल समाधान प्रदान करू शकते, व्यापार कार्यक्षमता वाढवू शकते आणि पुढे एक शाश्वत मार्ग तयार करू शकते.

# वंशाचा टेंभा नव्हे वंशाची ज्योती



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**मित्रांनो सप्रेम जय गुरु कालचा दिवस माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि उत्साहाचा राहिलेला आहे. याचे कारण म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंच महाराष्ट्र राज्य युवती विभाग संपर्कप्रमुख आमच्या ताईसाहेब साक्षी सगणे यांनी आपल्या आई-वडिलांच्या पवित्र हातांनी आपल्या चाय कक्ष या अमरावती येथील रवी नगर येथे बियाणी कॉलेजला लागून असलेल्या दुकानाचे उद्घाटन अमरावती येथील इतर व्यवसायिकांच्या उपस्थितीत केले. उद्घाटन समारंभ अगदी थाटात पार पडला याचा मी आणि माझे मित्र गणेश दादा गहूकर साक्षीदार आहे.**

मनात आणलं तर एक मुलगी काय करू शकते हे असे जिवंत उदाहरण आहे. बियाणी कॉलेजच्या आसपास किंवा अमरावती येथे एखाद्या क्वालिफाईड मुलीचे चहाचे दुकान मी आजपर्यंत तरी पाहिलेले नाही. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रबोधनकार तथा आधुनिक लोकसंत सत्यपाल महाराज नेहमीच आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून तरुणांना डोक्याच्या मालिश पासून बुटाच्या पॉलिश पर्यंत कुठलंही काम करा असा मौलीक संदेश देत असतात. त्याचं तंतोतंत पालन आमच्या साक्षीताईंनी केलेलं आहे. आणि म्हणून त्यांचा उपक्रम हा वाखाणण्यासारखा आहे इतर तरुणांनी आदर्श घ्यावाअसा आहे.

आपण पाहतो की अलीकडे मुली प्रगतीपथावर आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांनी आपला यशस्वी सहभाग नोंदवला आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांनी प्रगतीच सर्वोच्च शिखर गाठलेल आहे. शिक्षणाबरोबरच त्यांनी व्यवसायाचा किल्ला सुद्धा काबीज करावा. आपल्या केंद्र सरकारने नोटाबंदीच्या माध्यमातून आपल्याला दिलेलं बेरोजगारीचं प्रमाणपत्र फाडून फेकून लाथाडून त्यावर आपली नवी व्यवसायाची वाट शोधून त्यावर निर्भयपणे वाटचाल करावी. त्यासाठी सर्वप्रथम मुलींच्या पालकांनी त्यांच्यावर प्रथमतः विश्वास ठेवावा. मी साक्षी ताईच्या आई-वडिलांचे मनापासून अभिनंदन करतो की त्यांनी साक्षीताईंवर विश्वास ठेवला. नाही तर तू मुलगी आहे चहाचं दुकान लावणे हे मुलीबाळीचे काम आहे का? असे एक ना अनेक प्रश्न तिला विचारून तिच्या मनात फुललेली व्यवसायाची कळी तोडून चिरडून आणि पार कुस्करून टाकतात आणि म्हणून बहुजन समाजातील आणि विशेषतः शेतकरी कुटुंबातील मुलं हे व्यवसायामध्ये मागे राहतात ही वस्तुस्थिती आहे. आपल्याला माहीतच आहे की मुलींनी केलेली ही प्रगती ही भारतीय संस्कृतीतील एक मानवी मूल्याधिष्ठित समाजाची निर्मिती करणारा प्रवाह जो समतावादी आहे आणि



याच समतावादी महामानवांनी दिलेल्या विचारांची अनमोल देणगी आहे. याच भारतीय संस्कृतीचा दुसरा प्रवाह जो विषमतावादी आहे जो हे पिढ्यानपिढ्या सांगत आलेला आहे की म्हणती स्त्री ही गुलामची असते तिला हक्क नाहीत उद्धराया पुरते वरील ओळ ही ग्रामगीतेतील असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी वैदिक ग्रंथांचा दुटप्पीपणा चव्हाट्यावर आणलेला आहे आणि म्हणून मुलींनी केलेली ही प्रगती याच विषमतावादी वैदिकांच्या मुस्काटात मारलेली जोरदार चपराक आहे.

आजही या वैदिक ग्रंथांचा आणि मनुस्मृतीने केलेल्या नियम कायद्यांचा जनसामान्यावर जबरदस्त प्रभाव आहे आणि त्यामुळे मुलगा हा वंशाचा दिवा आहे असा भाबडा समज हा बहुजन समाजात आपल्याला पाहायला मिळतो. मी सर्वच मुलांना दोष देणार नाही पण प्रगतीच्या क्षेत्रात मुलं हे मागे पडत आहे ही वस्तुस्थिती आपण नाकारू शकत नाही. मुलांमध्ये व्यसनाचा वाढतं प्रमाण ही अत्यंत चिंतेची बाब आहे. व्यसनाने एकदा मेंदूचा ताबा घेतला की हा वंशाचा दिवा आपल्या आई वडिलावर पाशवी अत्याचार करत असताना आपण समाजामध्ये पाहतो. आपल्या वंशाला दिवा असावा असं प्रकर्षानं आई-वडिलांना वाटत असतं परंतु तोच दिवा फक्त आई-वडिलांच्या सरणाला टेंबा लावण्याच्याच कामी पडून तो वंशाला जाळुन खाक करणारा टेंबा ठरतो. हे भयान वास्तव आहे. दुसरीकडे अनेक मुली मात्र आपल्या आई-वडिलांचा सांभाळ करत असताना आपल्याला दिसत आहे. आणि प्रसंगी स्वतः आपल्या वडिलांच्या शिडी ला समर्थपणे स्वतःचा खांदा देताना आणि अंत्यसंस्कार स्वतःच्या हातांनी करताना सुद्धा आपण पाहतो. ती स्वतः जळते परंतु जळत असताना दोन दोन घरांना प्रकाशमान करणारी ही मुलगीच खऱ्या अर्थाने वंशाची ज्योती ठरते हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. अलीकडे मुलं हे आई-वडिलांना एटीएम ची मशीन समजतात. त्यामध्ये काही मुली पण आहे. परंतु साक्षीताईं स्वतःबी. ए GRADUATION AND AGREE DIPLOMA असून नोकरीसाठी प्रयत्नशील आहे असे असताना नोकरीवरच अवलंबून न राहता स्वतःच्या हिमतीवर जे व्यवसायिक पाऊल त्यांनी टाकलेलं आहे ते खरोखरच माझ्यासकट सगळ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सोमेश्वर मंदिरासाठी २ कोटी ४३ लक्ष रुपये मंजूर

## सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांचे फलित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यासह विदर्भातील शिवभक्तांसाठी आराध्य दैवत असलेल्या राजुरा येथील श्री क्षेत्र सोमेश्वर संस्थानचा विकास व्हावा, या राज्य संरक्षित स्मारकामध्ये सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी मा.ना.सुधीर मुनगंटीवार वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री चंद्रपूर यांनी दिलेला शब्द पूर्ण केला असून मंदिराच्या संवर्धनासाठी व सुविधांसाठी २ कोटी ४३ लक्ष ९७ हजार रुपये निधी मंजूर झाला आहे.

नुकताच ना. मुनगंटीवार यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सिद्धेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी १४ कोटी ९३ लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर सोमेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधीकडून सातत्याने मागणी होत होती, त्या मागणीची दखल घेत सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता आता त्याला मोठे यश प्राप्त झाले असून सोमेश्वर मंदिरासाठी २ कोटी ४३ लक्ष ९७ हजार निधी मंजूर झाला आहे .यामुळे मंदिराचे जतन व दुरुस्तीचे कामे गतीने पूर्ण होतील असा विश्वास वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे. या संदर्भातील अध्यादेश नुकताच निर्गमित करण्यात आला आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव एकछत्र योजनेंतर्गत सोमेश्वर मंदिर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्तीच्या कामांच्या अंदाजपत्रकास सांस्कृतिक कार्य विभागाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सोमेश्वर मंदिराच्या जतन आणि दुरुस्तीचे काम तात्काळ होण्यासंदर्भातील कार्यवाही तात्काळ करण्याची सूचना संबंधित यंत्रणेला केली होती. त्यानुसार शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

यामध्ये मंदिराचे जतन व दुरुस्ती करणे, दगडी सीमाभिंत बांधणे, जुन्या बांधकाम पृष्ठभागाची रासायनिक प्रक्रियेद्वारे स्वच्छता, झाडे- झुडुपे काढणे, ग्राऊंटींग करणे, लोखंडी ग्रील बसविणे, सूचना फलक, माहिती फलक आणि दिशादर्शक फलक बसविणे आदी कामे यामध्ये समाविष्ट आहेत. सुधीर मुनगंटीवार यांनी वाचनपूर्ती केल्याबद्दल भगवान महादेवाचे भक्तगण व परिसरातील जनतेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे.



# पेन्शन संघर्ष यात्रेचे नांदेड जिल्हयात जंगी स्वागत करणार : मारतळेकर

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष मा.रामपालसिंग व महासचिव कमलाकांत त्रिपाठी यांच्या मार्गदर्शनाखाली २००५ नंतरच्या शिक्षक कर्मचारी बांधवांना जूनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी या मागणीसाठी संपूर्ण देश पादाक्रांत करणारी पेन्शन संघर्ष यात्रा काढण्यात आली आहे. ह्या यात्रेच्या चार टिम चार मार्गाने प्रवास करत ५ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या काळात संपुर्ण भारत पिंजून काढणार आहेत. ह्यातील क्र.१ यात्रेचे २८ सप्टेंबर रोजी लातूर जिल्ह्यातून अहमदपूर मार्गे श्री क्षेत्र माळेगाव येथे ह्या यात्रेचे नांदेड जिल्हयात आगमन होणार आहे. या पेन्शन संघर्ष यात्रेचे नांदेड जिल्ह्याच्या वतीने राज्याध्यक्ष देविदासराव बस्वदे, दिलीपराव देवकांबळे, चंद्रकांत दामेकर, जयवंत काळे, चेअरमन सुधाकर थडके, प्रल्हाद राठोड,डी.एस. धात्रक, राजेंद्र बावणे, फारूख बेग,बी.डी.देशमुख,गंगाधर मावले, माणिक कदम,हणमंत जोगपेटे चंद्रकांत मेकाले, संतोष कदम, राजश्री देशमुख, शोभा मळवतकर,सुमन डांगे यांच्या उपस्थितीत श्री क्षेत्र माळेगाव येथे जोरदार उत्साहपूर्ण वातावरणात पारंपरिक वाद्यांच्या निनादात स्वगात करण्यात येणार असून माळेगाव ते लोहा बाईक रॅलीही काढण्यात येणार आहे व लोहा येथे कॉर्नर सभा घेण्यात येणार आहे. या सभेचे प्रास्ताविक अखिल लोहाचे तालुकाध्यक्ष मंगल सोनकांबळे यांनी केले.यावेळी म.राज्य जुनी पेन्शन संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोविंद करकीले, संघाचे जिल्हाध्यक्ष बाबुराव फसमले,संघाचे नेते पी.डी. पोले, शिक्षक सेनेचे विठ्ठल चव्हाण जूनी पेन्शन संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष जी. बी.बोथीकर, अंगद सुर्यवंशी,बालाजी बालाघाटे ,कोरडे डी. व्हि.,ओमकार बोधनकर चिंचोरे एस.जी. पारेकर आर.जे. श्रीमती मुदखेडे, श्रीमती नरंगले, श्रीमती मुंढे आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

# मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अभाविपने केला स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** अंबड शहरामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे तर्फे संपूर्ण मराठवाड्यामध्ये काढण्यात येत असलेल्या कृतज्ञता रथयात्रे चे आगमन झाले होते. यानिमित्त अभाविप शाखा अंबड तर्फे पाचोड रोड वरील 'पवन करिअर अकॅडमी' मध्ये नागरी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यास नागरिकांचा, विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. या नागरी सोहळ्यामध्ये अंबड तालुक्यामध्ये ज्यांनी निजामाविरुद्ध लढा देऊन निजामाची जुलमी राजवट उध्वस्त करण्याचे कार्य केले. अशा शासनमान्य स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. आता यातील अनेक स्वातंत्र्य सैनिक स्वर्गवासी झाल्यामुळे त्यांच्या वारसांचा सन्मान सोहळा पार पडला. या कार्यक्रमासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे क्षेत्रीय संघटन मंत्री श्री देवदत्त जोशी, अंबडच्या अप्पर तहसीलदार ऋतुजा पाटील मॅडम, अभाविप देवगिरी प्रदेश उपाध्यक्ष प्रा नाना गोडबोले, शहर मंत्री माधव उद्देवाल व यात्रा प्रमुख सुरेश माटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापक श्री सुरेश जगताप हे होते. मा देवदत्त जोशी व आंबडच्या अप्पर तहसीलदार ऋतुजा पाटील मॅडम यांच्या हस्ते स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांचा शाल,पुष्प व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी अंबड शहर व परिसरातील पुढील स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांचा सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय माजी आमदार भालचंद्र कुलकर्णी (अंबड) यांचे चिरंजीव डॉ यशवंत कुलकर्णी, स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय माधवराव देशमुख, (साडेगाव, तालुका अंबड) यांचे नातू सुभाष देशमुख, स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय पंढरीनाथ गोविंद तत्सत (अंबड) यांचे नातू किरण देशपांडे, स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय भवानीदास देशपांडे (साडेगाव, तालुका अंबड) यांच्या कन्या सौ छाया देहेडकर व नातू डॉ परीक्षित देशपांडे, स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय निवृत्ती काकडे साडेगाव यांचे पणतू श्री अनिकेत काकडे, स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय बापूसाहेब देशमुख (साडेगाव) यांच्या नातसून एडवोकेट सौ उषा देशमुख, स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय दगडूजी जारे तीर्थपुरी यांचे नातू एड. कैलास जारे, स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय बाळासाहेब देशमुख अंबड यांचे चिरंजीव श्री अशोक देशमुख, स्वातंत्र्य सैनिक स्वर्गीय प्रल्हाद सिंह ठाकुर (अंबड) यांचे चिरंजीव श्री दीपक भैय्या ठाकूर, स्वतंत्र्य सैनिक स्वर्गीय वसंतराव देशमुख (अंबड) यांचे चिरंजीव श्री कांतराव देशमुख, स्वर्गीय मोतीलाल शर्मा यांचे चिरंजीव एडवोकेट शर्मा, स्वर्गीय देविदत्त ओझा ( माजी नगराध्यक्ष, अंबड) यांचे चिरंजीव श्री राजेश ओझा इत्यादी स्वातंत्र्यसैनिक वारसांचा सन्मान करण्यात आला.

त्याचबरोबर नागरी सोहळा संपल्या नंतर अंबड शहरातील नगरपालिकेसमोरील स्वातंत्र्य सैनिक स्मृतीस्तंभाला भेट देऊन पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या.





# तूर डाळ प्रतिकिलो १७५ रुपयांपर्यंत

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** गेल्या काही महिन्यांपासून सर्वसामान्याच्या जेवणाच्या ताटावर करडी नजर पडली आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीचा आलेख सातत्याने वाढत आहे. दोन महिन्यांपूर्वी चटक टोमॅटोची चढलेली लाली आता ओसरली असून जेवणातील डाळींचे दर वाढले आहेत. आज गोंदिया बाजारात तूर डाळ प्रतिकिलो १७५ रुपयांपर्यंत दर झाल्याचे कळले. सरकार एकीकडे गॅस सिलिंडर स्वस्त करतात, तर दुसरीकडे इतर जीवनावश्यक वस्तू, खाद्यपदार्थांच्या दरात वाढ होत आहे.

महाराष्ट्र Business Katta









# पोळा माझ्या माहेरचा...



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**आपल्या हिंदू संस्कृती सणांना फार महत्त्व आहे. प्रत्येक सण आपले वेगळेपण जपणारा आहे. श्रावण महिन्यात येणाऱ्या अनेक सणांमधला एक महत्त्वपूर्ण सण म्हणजेच पोळा हा होय. आपल्या खांद्यावर शेतीची धुरा सांभाळणाऱ्या, वर्षभर राबणाऱ्या बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजेच पोळा. दोन दिवसांवर आलेला पोळा या सणानिमित्त "माझ्या माहेरचा पोळा" मला आठवला. बालपणातील अनेक आठवणी जाग्या झाल्या. त्याच आठवणी इथे व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न... आज आठवतो बाई, पोळा माझ्या माहेरचा... कानी ऐकू येई नादं, बैलाच्या गं घुंगराचा... परभणी जिल्ह्यातील दुर्डी हे माझे माहेर... तसे पाहता हे गाव अगदीच छोटेसे आहे. म्हणावा तेवढा गावाचा विकास अजूनही झालेला नाही.**

माझ्या बालपणी तर अगदी मूलभूत सुविधाही गावात नव्हत्या. असो... परंतु काही सणांना मात्र गावात फार मज्जा यायची... आमचे एकत्र कुटुंब होते. माझे तीन काका -काकू, आई- वडिल, मोठा चुलत भाऊ -वहिनी त्यांची दोन मुलं, पाच चुलत भावंड, मी व माझे दोन भाऊ असे एकंदर वीस माणसांचे आमचे कुटुंब होते. आम्हाला ४०एकर जमीन होती. म्हणजे अजूनही आहे.. परंतु कालानुरूप शेतजमिनीची आता वाटणी झालेली आहे. भरपूर शेती असल्यामुळे शेतात दोन बैल जोड्या होत्या. भरपूर गाई -वासरे यांनी वाडा भरलेला होता. त्यामुळे आमच्या घरी पोळ्याला फार मज्जा यायची. पोळा सणाची तयारी दादा म्हणजेच माझे लहाने चुलते श्री. एकनाथराव चोपडे खूप आधीपासूनच करायचे. बैलांना लागणाऱ्या वेसनी ,कासरे, मुंगसे, मोरक्या,गोंड्याची झाडे,पायात तोडे इ. प्रकारचे साहित्य आधीपासूनच दादा तयार करायचे. त्यासाठी सूत आणायचे...
व ते गिरक्यावर फिरवून त्याची दोरी बनवायचे. बनवलेल्या दोरी पासून वरील प्रकारचे सर्व साहित्य तयार करायचे. या गोष्टीची त्यांना खूप आवड होती. आमचे बरेच पाहुणे दादांकडून असे बैलांसाठीचे साहित्य तयार करून घ्यायचे.दादांनी बैलांसाठी खूप सुंदर झुली व बाशिंगे ही विकत घेतली होती. त्या झुलींवर खूप छान नक्षीकाम केलेले होते. बैलांच्या बाशिंगावर आरसे लावलेले होते. सर्व गावात आमचेच बैल खूप छान दिसावेत असे आम्हाला तेंव्हा वाटायचे. दादांचीही पोळ्याची जय्यत तरीच तयारी सुरू असायची.

बैलांच्या शिंगाला लावण्यासाठी तीन प्रकारचे रंग आणले जायचे. त्यावेळी त्याला वारणेस असं म्हणायचे. पोळ्याच्या दिवशी फोडण्यासाठी भरपूर नारळं आणून ठेवत. पोळ्याच्या आदल्या दिवसाला 'खांदे मळण' असं म्हणतात. 'खांदे मळण 'याच शब्दाचा अपभ्रंश होऊन ग्रामीण भागात खांड मळण असा शब्द प्रचलित झालेला आहे. बैलांच्या खांद्यावर वर्षभर शेतीचा भार असतो. बैलगाडी हाकणे. औत चालवणे यांसारखी कष्टाची कामे त्यांना करावी लागतात. त्यामुळे त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या दिवशी बैलांना सकाळपासून चारायला घेऊन जातं...दुपारी त्यांना अंघोळ घालतं... सायंकाळी 'मोळ' नावाच्या एका गवताने त्यांच्या खांद्याला दूध लावले जायचे. नंतर त्यांच्या पायावर पाणी टाकून पूजा केली जायची. त्यांना कुटलेल्या ज्वारीच्या पिठापासून बनवलेली फळं व साधे वरण खाऊ घालायचे. नंतर एका ताटावर मोळाच्या छोट्याशा पेंढीने वाजवत बैलाच्या कानात मोठ्या आवाजात,"धोंडी गेला शेताला .... पाऊस आला मोठा... हर हर महादेव... ची गर्जना करत...
खांदे मळणीच्या दिवशीही बैलांना शेतात कामाला जुंपले जात नाही. बैलांची पूजा झाल्यावर घरी सर्वांची जेवण होतात. शेतातील कामावर असणारे गडी व शेतमजुरांना सुद्धा या वेळी घरी जेवायला बोलावले जाते. अशाप्रकारे खांदे मळणीचा दिवस साजरा केला जातो.

खांदे मळणीच्या नंतरचा दुसरा पोळ्याचा असतो. या दिवशी आमच्या घरी सर्व बायकांची स्वयंपाकाची खूपच लगबग असायची. कारण पोळ्याच्या दिवशी खूप वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ करावे लागायचे. पुरणपोळी, गुळवणी, कढी, आमटी, भात, भजे, वडे, पापड, तसेच भेंडी गवार, वडा, भोपळा यांची मिसळीची भाजी....इ. पदार्थ बैलाच्या नैवेद्यासाठी तयार करावे लागायचे. त्यामुळे सकाळपासूनच आमच्या घरातील सर्व महिला मंडळ या स्वयंपाकात गुंतलेले असायचे. महिलांना इतर कामासाठी वेळच नसायचा. या दिवशी मी व माझी चुलत बहीण मीरा आमच्या मागे एक काम ठरलेलेच असायचे. घरातील दरवाजाच्या बाजूंच्या भिंतीवर काव कालवून झाडं काढायला (चित्र)लावायचे. या झाडांच्या बाजूला पास, विडी अशी शेतीची लागणारी अवजारे सुद्धा काढावी लागतं. घरातील झाडं (चित्र )काढणं झाले की, आम्ही गाई- गुरांच्या वाड्यातील भिंतीवर झाडे काढण्यासाठी जात असू. आपलं झाड जास्तीत-जास्त कसे छान दिसेल याची आम्हा दोघींमध्ये स्पर्धा चालायची.

सकाळी अकरा- साडेअकरा वाजल्यापासूनच बैलांच्या शिंगांना रंग द्यायला सुरुवात केली जायची. या कामात माझे दोन नंबरचे चुलते श्री पंढरीनाथ मोठा भाऊ अशोक व कामावरील गडी मदत करायचे. मोठे चुलत्यांचे नाव मुंजाजी होते. चार पाच सहा वर्षांपूर्वी ते वारले.आम्ही बाबा म्हणायचो ते फक्त सर्व देखरेखीचे काम करायचे.लाल ,पिवळा, हिरवा किंवा केशरी, पांढरा, हिरवा.. अशा तीन पट्ट्यात बैलांच्या शिंगांना रंग दिला जायचा... शिंगांचा रंग वाळला की, त्यांना झुली घालून ,बाशिंग व नव्या मुरक्या घातल्या जात. काहीजण बैलांच्या अंगावर वेगवेगळ्या रंगांचे वर्तुळाकार छापेही देत असत. सर्व प्रकारची सजावट केली जायचे. काही लोक बैलांच्या शिंगांना फुगे ही बांधत असत. महालक्ष्मी समोर ठेवण्यासाठी केलेली विविध प्रकारचे सजावटीची झाडं बैलांच्या शिंगांना बांधत असत. नागवेलीच्या पानांची माळ ही बैलांना बांधली जायची. दुपारपर्यंत ही सर्व सजावट पूर्ण व्हायची. आम्ही कधी स्वयंपाक घराकडे तर कधी बैलांच्या वाड्याकडे चकरा मारायचो. स्वयंपाक घरातही वेगवेगळ्या पदार्थांचा खमंग वास सुटलेला असायचा. परंतु बैलांना नैवेद्य दाखवल्याशिवाय आम्हाला त्यातलं काहीच मिळायचं नाही. सकाळीच सगळ्या देवांना नारळं फोडून झालेले असायचे. त्यामुळे पोळ्याच्या दिवशी घरोघर भरपूर नारळ खायला मिळायचा. नारळाचे तुकडे हातात घेऊन आम्ही इकडे -तिकडे फिरायचो. घरी चिकन मातीच्या चिखलापासून मोठ-मोठे बैल बनवलेले असायचे. त्या बैलांची पूजा केली जायची. त्यांना वस्त्र व नागवेलीची माळ घालून नैवेद्य दाखवला जायचा. दुपारी तीन- चार वाजता बैल हनुमान मंदिराजवळ यायचे. सर्व बैल जोड्या वेगवेगळ्या प्रकारे सजावट करून आलेल्या असायच्या. माझे वडील सरपंच असल्यामुळे काही गैरप्रकार घडू नये याची काळजी घेत असत. सुरक्षेसाठी एक-दोन पोलीस गावात आलेले असायचे.आम्ही हनुमान मंदिराच्या पाठीमागे बसून सर्व बैल जोड्यांना न्याहाळत असू. गावातील माझ्यासारख्याच बऱ्याच मुलीही आपापल्या बैलांना बघायला आलेल्या असायच्या. सगळ्या मुलींना आपापलेच बैल अधिक सुंदर वाटायचे. मुकदमाच्या बैल जोडीचा पहिला मान फिरण्याचा असायचा.. त्यानंतर इतर बैल जोड्यांना फिरवले जायचे. बैल मंदिराला प्रदक्षिणा घालताना खूप भीती वाटायची. कारण बैल तेव्हा खूप धावत असायचे. अशावेळी एखादे लहान मूल मध्ये येऊ नये याची काळजी गावकरी घेत असत.



काही गावात बैलांचे लग्नही लावण्याची पद्धत आता प्रचलित आहे. माझ्या चुलत भावंडांना ही छोटेसे वासरू हातात घेऊन मंदिराभोवती फिरावेसे वाटायचे. पण घरच्यांची काही परवानगी मिळायची नाही. मंदिराला एक प्रदक्षिणा मारून होताच प्रत्येक बैलजोडी आपापल्या घरी जायची. घरी एका बाजेवर धोतर अंथरून त्यावर जू,पास, शिवळा, जोते,इ. शेतीची अवजारे मांडलेली असायची.जुवाच्या छिद्रांमध्ये छोटीशी पळसाची फांदी टाकत असत. एक छोटेशे मडके,त्यावर खापराचीच झाकणी. बैल घरी आल्यावर त्या मडक्यात काहीतरी टाकून बैलांच्या कानाजवळ वाजवत असत. हे सर्व काव लावून रंगवत व त्यावर चुन्याचे ठिपके दिले जात. ते सर्व खूप छान दिसायचे. एका टोपल्यात थोडेसे गहू ,ज्वारी बैलांना खाण्यासाठी ठेवत असत.
बैल घरी आल्यावर प्रथम त्यांच्या पायावर पाणी टाकून नंतर कुंकू लावून त्यांना ओवाळले जायचे. पुरणपोळी सह सर्व पदार्थांचा नैवेद्य बैलांना भरवला जायचा. एखाद्या बैलाने जर नैवेद्य खाल्ला नाही तर तो रुसला असे समजले जायचे. अशाप्रकारे एकदा नैवेद्य खाऊन बैल पुन्हा एकदा मंदिराला प्रदक्षिणा घालायला जायचे. नंतर बैलांना शेतात किंवा बैलांच्या वाड्यात बांधत असत. बैल फिरवण्याचा कार्यक्रम झाल्यावर घरातील सर्व पुरुष मंडळी व कामावरील गडी व शेतमजूर यांची जेवण होत. आम्हा मुलांनाही याच गडबडीत जेऊ घातले जायचे.शेवटी सर्व महिला मंडळांची जेवण व्हायचे. त्या जेवणाची चव काही औरच असायची. जेवण झाल्यावर आवर्जून विड्याचे पान आम्हाला सर्वांना खायला मिळायचे.सायंकाळी गावातील सर्व पुरुष मंडळी घरोघर ज्येष्ठ व्यक्तींचे दर्शन घेण्यासाठी फिरायचे. आमच्या घरातील सर्व महिला यावेळी हातात फोडलेल्या नारळाचे तुकडे घेऊन बसायच्या नमस्कार करणाऱ्या सर्वांच्या हातात प्रसाद म्हणून एकेक तुकडा दिला जायचा. आम्ही सुद्धा असेच वाड्यात सर्वांच्या पाया पडण्यासाठी फिरायचो. अशाप्रकारे हा पोळा सण माझ्या माहेरात आजही उत्साहात साजरा केला जातो...

# कवितेची जन्मकथा : ऋण : श्री. दि. इनामदार



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**एखादा सहज प्रसंग, किंवा आपला भोवताल आपल्या मनावर सतत मोहिनी घालत असतो. त्याचे पडसाद आपल्या मेंदू आणि मनावर पडत असतात. हे पडसाद जेंव्हा शब्द रूप घेऊन साकार होतात तेंव्हा ती एक चिरंतन रचना असते असे मला नेहमीच वाटते. एखादा बैल आपल्याला सहज दिसतो आणि त्याच्याकडे पाहिल्यावर एखादेवेळी संपूर्ण जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी कविता निर्माण होते ही खरी प्रतिभेची देणगी आहे. एखादा कवी किंवा लेखक समोरच्या जीवाची वेदना स्वतःची समजून व्यक्त होतो आणि त्या दुःखाची सल त्याला स्वतःला बोचायला लागते तेंव्हा त्याच्या मनावर उमटणारे स्पंद हे निश्चितच त्याच्या सर्वोत्कृष्ट निर्मितीची पायाभरणी करत असतात. अशीच एका प्राण्याकडे पाहून त्या प्राण्यांच्या मनाच्या तळापर्यंत जाऊन त्या प्राण्यांच्या मनात काय भाव असतील ह्याचा शोध घेत कवी श्री. दि. इनामदार ज्यांचा जन्म 5 फेब्रुवारी 1928 रोजी खामगाव ह्या गावी झाला. (त्यांना 'मराठवाड्याचे रवींद्रनाथ टागोर असे म्हटलें जायचे ) ह्यांनी लिहिलेली ऋण ही अशीच एक कविता होय.**

इयत्ता 6 वी च्या अभ्यासक्रमात ही कविता मुलांना शिकवीत असतांना एका वेगळ्याच भावविश्वाची निर्मिती व्हायची. आज शहरामध्ये बैल डोळ्याने दिसत नाही. काही ठिकाणी तर ट्रॅक्टरचा पोळा भरल्याच्या बातम्या येतात. म्हणजे बैल ह्या सजीवांची आपल्याला गरज नसल्याचे आपण पक्के ठरवून टाकल्याची ती पावती असते असे मला वाटते. बैल हा पूर्वपार काळापासून शक्तीचे प्रतीक आहे, आपल्या संस्कृतीत प्रत्येक कामाच्या प्राणिमात्राचे दैवतीकरण केल्या जात असल्याने बैल ह्या शेती उपयोगी आणि शक्तीचे प्रतीक असलेल्या प्राण्याला महादेवाच्या मंदिरापुढे नंदी म्हणून तसेच महादेवाचे वाहन म्हणून स्थान देण्यात आले. ह्या दैवतीकरणात किती तथ्य आहे किती श्रद्धा आणि अंधश्रद्धा आहे ह्यापेक्षा बैल मानवाचा पोशिंदा आहे ही जाणीव अधिक महत्वाची होती. सम्राट अशोकाच्या अशोक स्तंभावर बैल असणे ही बैलाच्या कष्टाचा गौरव करणारी बाब होती असे मला वाटते. ईनामदार ह्यांनी ही कविता लिहिताना ह्या कष्टकरी आणि जगपोशिंदा असणाऱ्या प्राण्यांकडे पाहत त्याच्या डोळ्यातील कणव पाहिली. म्हातारंपण ही अशी देणगी असते की जी स्वतःचे असले तरी स्वतःला नको असते मात्र ते कुणालाच चुकत नाही हे ही तितकेच खरं. श्री दि ईमानदारी ह्यांनी ही कविता म्हाताऱ्या बैलाचे दुःख मांडण्यासाठी लिहिली की अन्योक्ती ह्या काव्य प्रकारानुसार लेकींबोली सुने लागे ह्या म्हणी प्रमाणे बैलाच्या प्रतिकातून म्हाताऱ्या माणसाचे मत व्यक्त केले हे सांगणे कठीण आहे. श्री दि ईनामदार हे बालसाहित्य लिहून मनोरंजन आणि बोध देणारे साहित्य देण्यासाठी प्रसिद्ध होते त्यांना एक बैल खुंट्याला बांधलेला दिसला, तो बैल म्हातारा झाल्याने आता शेताच्या कामात येत नव्हता त्यामुळे मानवाच्या स्वाभाविक वृत्तीनुसार त्याला चारा पाणी करताना हाथ आखडता घेणे, त्याची खायला काळ भुईला फार असे म्हणून संभावना करणे. त्याला शिव्या देणे, तो उठत नसल्यास त्याला कोरड्याने (आसुडाने) मारणे, डंगऱ्या, म्हाताऱ्या म्हणणे इत्यादी बाबी कवींनी जवळून पाहिल्या. हाच बैल जेंव्हा तरुण होता तेंव्हा मालकाच्या गळ्यातील ताईत असेल, कितीतरी कोड कौतुकाचे क्षण त्याने अनुभवले असतील मात्र आणि काम नाही म्हणून त्याला दाम नाही ही जाणीव कवीला अस्वस्थ करून गेली. त्या बैलाच्या डोळ्यांतील दुःख कवीला अस्वस्थ करून गेले आणि त्याच वेळी संपुर्ण हयातीत कुटुंबासाठी खस्ता खाणाऱ्या माणसाच्या वाट्यालाही असेच दुःख येते ह्या जाणिवेतून ते आणखी अस्वस्थ झाले आणि एकाचवेळी घरातील वृद्ध व्यक्ती आणि खुंट्यावरील म्हातारा बैल ह्यांची वेदना नेमकेपणाने मांडणारी शब्द आरास उभी राहिली. कवितेतील साधे शब्द, सरळ भावना ग्रामीण असो वा शहरी भाग मात्र काव्यपार्श्वभूमीचा साधारणपणे सर्वांनी फार जवळून घेतलेला हा दाहक अनुभव ह्यामुळे वाचकांच्या मनाला पीळ पाडणारी ही कविता मनात खोलवर रुतत जाते, जितकी आत उतरत जाते तितकी सलत जाते असा अनुभव कविता वाचताना येतोच.

***तुझ्या शेतात राबून माझी सरली हयात,***
***नको करू हेटाळणी आता उतार वयात***
***नाही राजा ओढवत चार पाऊल नांगर,***
***नको बोलूस वंगाळ नको म्हणूस डंगर !***

आपल्या धन्याच्या शेतात सारी हयात कष्ट करत राबत खपत, आयुष्यभर प्रचंड काम करत नांगर, वखर, बैलगाडीतून मालाचे ओझे वाहून राब राबून थकून भागून आयुष्याच्या उतारवयात आलेल्या बैलाची ही कैफियत आहे असे म्हटले तरी चालेल वा संपूर्ण आयुष्य घरादाराची गरज पूर्ण करत पायाला चाके आणि हृदयात घड्याळ ठेवून



जगणाऱ्या कुटुंब प्रमुखाची ही व्यथा आहे असेही आपणास म्हणता येईल. सारे आयुष्य त्यानी शेतात आपल्या धन्यासाठी किंवा लेकरांच्या कल्याणासाठी कष्ट करण्यात घालवली आहेत आणि आता त्याच्याकडून काम होत नाही तेंव्हा त्याची हेटाळणी होऊ नये असे त्याला मनोमन वाटणे साहजिकच आहे. मात्र दुर्दैवाने तसे होत नाही. खुंट्यावरच्या बैलाला आणि घरात म्हाताऱ्या माणसाला हेटाळणीयुक्त बोल व्यथित करतात. आयुष्यभर आपण ज्यांच्यासाठी राबलो कष्टलो त्यांच्या कडून होणारी ही निर्भत्सना त्याला सहन न होणारी असते. ग्रामीण भागातील शेतकरी असो वा शहरी भागातील सेवानिवृत्त कर्मचारी किंवा खुंट्यावरच्या बैलाच्या वाटयाला येणारी ही हेटाळणी ही नवीन पिढीच्या कृतघ्नतेचे लक्षण आहे ह्यात शंका आहे. म्हातारंपणी ज्यांची हेटाळणी केली जाते त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात हीच तरुण पिढी कशी वागत असेल ह्याचा विचार करत असताना कवींनी लिहिले.

**माझ्या ऐन उमेदीत माझी गाईलीस ओवी,**
**नको चाबकासारखी आता फटकारू शिवी**
**माझा घालवाया शीण तेव्हा चारलास गूळ,**
**कधी घातलीस झूल कधी घातलीस माळ**


ह्या ओळीतून बैल म्हणतो की त्याच्या ऐन उमेदीत म्हणजे तरुणपणी जेंव्हा त्याच्या अंगी दहा हत्तीचे बळ होते अन प्रचंड कष्ट करण्याची क्षमता होती तेंव्हा त्याचा धनी त्याची अपार स्तुती करत होता. आमचा बैल किती ओझं ओढतो, ह्या वाक्यापासून तर शंकरपटात बैल जिंकल्यावर गावातून मिरवणूक काढणे इत्यादी सर्व केल्या जात होते. पोळ्याच्या दिवशी तर मारुतीच्या पारावर तोरणा घालून असा देखणा बैल मिरवताना धनी छाती पुढे काढून चालत असे. शर्यतीत जिंकलेल्या बैलाच्या तोंडात गूळ घालणे आणि साज शृंगार करून बैलाच्या अंगावरून झुल टाकून मिरवणे हे ही धनी गर्वाने करत असे.जसे बैलाचे तसेच माणसाचेही नाही का? जोपर्यंत बाप कमावत असतो आणि मुलं लहान असतात त्यावेळी बाप त्यांच्या अस्मितेचा मुद्दा असतो. "तुझ्या बापाला काही येत " असे कुणी लहानपणी म्हंटल की मुलांचा चढणार पारा प्रसंशनीय असतो मात्र तोच मुलगा मोठा झाला की त्याच बापाला ,"तुम्हाला अक्कल नव्हती" अस बोलतांना विचार करत नाही. जगातील सर्वात चांगली पिठलं भाकर मायच्या हाताची म्हणणारा मुलगा घरात त्यांची बायको आली की त्याला आईच्या हाताच्या भाज्या बेचव आणि पोळ्या जाडसर वाटू लागतात. हे दुःख आणि खंत श्री दि ईनामदार ह्यांनी बैलाच्या प्रतिकातून व्यक्त केली आहे. ह्या अश्या अनेक गोड आठवणी बैल असो वा मनुष्य असो त्याला मरेपर्यंत जपाव्या वाटत असतील ह्या विचारातून कवींनी पुढे लिहिलेले कडवे फार महत्वाचे ठरते. **अशा गोड आठवणी त्यांचे करीत रवंथ, मला मरण येऊ दे, तुझे कुशल चिंतीतमेल्यावर तुझे ठायी पुन्हा एकदा रुजू दे,**

**क्रमशः**

# कावडयात्रा, तरुणाई आणि श्रावणमास

आधुनिक केसरी

**दिवसा हातात खराटा घेऊन गल्लीबोळी मधील घाण साफ करत रात्री कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील घाण साफ करणारा संत गाडगे महाराज यांच्या सारखा संत विदर्भाच्या भूमीत होऊन गेला. गाडगे बाबां कधी मंदिरात गेले नाही मात्र त्यांनी मंदिरात- तीर्थक्षेत्राला जाणाऱ्या भाविकांसाठी धर्मशाळा बांधल्या. धनिक मंडळी त्यांना कीर्तनाला निमंत्रण द्यायची.बाबा,तुमचे कीर्तन आमच्या गावात होऊ द्या असा आग्रह धरायची त्यावेळी गाडगे बाबा त्याला म्हणायचे, मी येतो, पण तू साऱ्या गावाला अन पंचक्रोशीला पुरण पोळीचे जेवण देशील का..? तो हो म्हणाला की गाडगे बाबा त्या गावात जायचे आणि कीर्तनातून समाजप्रबोधन करायचे.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

उसळलेली तुफान गर्दी, तरुणाई मध्ये दिसून येणारा जोश, गर्दी डोळे दिपवून टाकणारी होती. शेकडो किमी तरुणाई पायी जाते.कमरेला गुंडाळलेला भगवा कापड,ज्योत हातात घेऊन अनवाणी धावणारा तरुण,त्याच्या सोबतीला त्याच्या सोबत धावणारे आणि नंतर तीच ज्योत आपल्या हातात घेऊन पुढे धावत जाणारे विशी-पंचवीशीतील तरुण, ज्या रस्त्याने ही कावडयात्रा जाणार असते त्या रस्त्यावर केलेले सडामार्जन, ठिकठिकाणी काढलेल्या रांगोळी, पूजेसाठी जमलेली गर्दी,त्यांच्या स्वागतासाठी आतुरतेने वाट बघत प्रतीक्षा करणारे आमदार-खासदार-नगराध्यक्ष, जिप पंस सदस्य, इतर राजकारणी, पक्षाचे- संघटनेचे पदाधिकारी,असा वेगळाच माहोल अख्या महाराष्ट्र राज्यात अन देशभर बघायला मिळाला.

आग्रहाने पुरण पोळीचा भंडारा ठेवायला लावणाऱ्या बाबांना तो धनिक माणूस पुरण पोळी चे जेवण करायचा आग्रह करायचा,बाबांनी पुरण पोळी ला कधी हात लावला नाही,कारण एका व्यापाऱ्याकडे कामाला असतांना त्यांनी पुरण पोळी मागितली म्हणून त्यांना व्यापाऱ्याने हात समोर करायला सांगितले, बाबांना वाटले आपल्याला पुरण पोळी मिळते,त्यांनी हात समोर करताच त्या शावकाराने त्यांच्या हातावर काठीने वार केले. तेव्हा पुरण पोळी अशा पद्धतीने मिळाल्याने बाबानी पुन्हा कधी हात लावला नाही. परंतु लोकांना मात्र त्यांनी यापद्धतीने पुरण पोळी खाऊ घातली. हा सगळा इतिहास सांगण्याचा माझा हेतू वेगळाच आहे. तत्पूर्वी आपण या श्रावण महिन्यात भव्यदिव्य प्रमाणात सर्वत्र ज्या कावडयात्रा निघाल्या,त्या कावडयात्रेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, वाखाणण्याजोगा होता.

सोशल मीडिया च्या माध्यमातून हिंगोली येथील कावडयात्रा बघायला मिळाली.त्या यात्रेत लोकांची

श्रावण महिन्यात शिवशंकराच्या पूजेला, आराधनेला विशेष महत्व आहे. नवरात्रीत देवी तर श्रावण महिन्यात शंकराला पूजल्या जाते.

भगवान परशुराम यांनी सर्वात अगोदर कावडयात्रेची सुरुवात केली होती. परशुराम यांनी गढ मुक्तेश्वर धाम येथून गंगा जल आणले. आणि उत्तरप्रदेश मधील बागपत च्या जवळ असलेल्या संपूर्ण महादेवाचा गंगाजलाने अभिषेक केला होता आणि तेव्हापासून ही कावडयात्रा सुरू झाली असे म्हटल्या जाते. धार्मिक भावना जपणे अत्यंत महत्वाचे आहे. मात्र आज तरुणाई ज्या पद्धतीने आपल्या आयुष्यातील अमूल्य वेळ वाया घालवते आहे त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे.



आज आपले चंद्रयान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर जाऊन पोहचले आहे,असे असतांना तरुणाईने आपला अमूल्य वेळ देशाच्या विकासासाठी, समजपयोगी कार्यासाठी आणि स्वतःला घडविण्यासाठी आणि त्यामाध्यमातून देशाचा भावी मजबूत आधारस्तंभ म्हणून उभे ठाकण्यासाठी घालविणे अत्यंत महत्वाचे आहे. ज्यांची प्रापंचिक जबाबदारी संपलेली आहे. अशानी ह्या प्रथा जिवंत ठेवण्यासाठी आपले योगदान देत तरुणाई ला दिशा देत त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. घरी पाहुणे आले तर आपल्या मुलांना त्यांच्या समोर पाणी सांगावे की नाही याची हिंमत अलीकडच्या पालकांना होत नाही. कावडयात्रेत जाऊन आलेल्या तरुणाईत काही विशेष बदल घडल्याचे बघण्यात येत नाही. आईवडिलांचे न ऐकणारा आता आज्ञाधारक झाला आहे, व्यसन असणारा व्यसनमुक्त झाला आहे असे काही चमत्कार बघायला मिळालेले नाहीत. एक एक महिना अनवाणी धावत पळत सुटायचं, त्याऐवजी गावातील नाल्या साफ केल्या, साफसफाई केली तर आपले स्वतःचे गाव, स्वतःचा परिसर रोगमुक्त तरी होईल मी नास्तिक नाही, मी श्रद्धाळू आहे, देवांच्या दर्शनाला जाणारा आहे. मात्र श्रद्धा ही डोळस असावी. ज्या प्रमाणे संत गाडगे महाराज मंदिरात गेले नाही,परंतु मंदिरात जाणाऱ्या,तिर्थक्षेत्रावर जाणाऱ्या भाविकांसाठी त्यांनी वर्गणी गोळा करून धर्मशाळा बांधल्या. कारण देव हा दगडात नाही तर तो चालत्या- बोलत्या माणसात आहे हे त्यांना ज्ञात होतं. मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे याची त्यांना जाणीव होती.

कावयात्रे चे आध्यात्मिक स्वरूप आता गळून पडले आहे... कावडयात्रा ही आता एक इव्हेंट झाली आहे आणि तरुणाई त्या इव्हेंटचा एक भाग बनते आहे. एकीकडे पंढरीच्या विठुराया च्या दर्शनाला पालखीत पायी जाणाऱ्या वारकऱ्याबद्दल लोकांची अशी मते नाहीत.कारण पालखीत नसतो डीजे, ना नसतो मुक्त संचार, ना नसते बेशिस्त, ना नसते बिडी काडी चा आधार. तिथे पाहायला मिळते शिस्त. कारण तिघे असतो विठलाच्या दर्शनाचा ध्यास अन त्याच्या दर्शनाची आस ठेवून पाऊले पंढरीची वाट धरतात. वारकऱ्यांनी पायदळ वारीला कधी इव्हेंट होऊ दिले नाही, हे तितकेच खरे !

# गरिबीच्या आडून सोन्या चांदीचे प्रदर्शन



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतात नुकतीच G-20 परिषद पार पडली. एखाद्या आतंरराष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष पद भारताकडे येत असेल तर हा प्रत्येक भारतीयांचा गौरव आहे. देशाचा मान सन्मान ज्या ठिकाणी वाढतो त्या ठिकाणी प्रत्येक भारतीय नागरिकांना देशाप्रती अजून जास्त आपुलकी निर्माण होऊन भारतीय असल्याचा अभिमान निर्माण होणे हे जिवंत व जागृत माणसाचे लक्षण आहे. गेल्या वर्षभरात जी ट्वेन्टी परिषदेचे सदस्य भारतातील वेगवेगळ्या शहरात जाऊन तेथील आढावा घेतला. जी ट्वेन्टी परिषद भारतात होणार परकीय पाहुणे देशात येऊन पाहणी करणार म्हटल्यावर सर्व यंत्रणा कामाला लागली. ज्या ज्या शहरात जी ट्वेन्टी परिषदेचे सदस्य भेटी देणार ते शहरे करोडो रुपये खर्च करून स्वच्छ करण्यात आली.**

शहराचे सुशोभीकरण करण्यात आले. मुख्य रस्त्यावरचे अतिक्रमण काढून रस्त्याचे रुंदीकरण करणे, मोठ्या रस्त्यावर दुभाजक टाकून ठिक ठिकाणी संरक्षण कटगरे तयार करण्यासारखे अनेक लहान मोठे काम केले गेले. या परिषदेमुळे अनेक शहराचा कायापालट करण्यात आला. रंगरंगोटी व चित्राच्या माध्यमातून आकर्षक चित्रकलेचीही जाणीव भारतीय लोकांना झाली. आणि विषेश म्हणजे सरकारने जर मनावर घेतले तर संपुर्ण देशाचा विकास व्हायला काहीच वेळ लागणार नाही याची जाणीव ही लोकांना झाली. ज्या शहरात जी ट्वेन्टी परिषदेचे सदस्य येणार आणि त्या शहरात रस्ते बरोबर नसतील, सांडपाण्याची योग्य सुविधा नसेल, रस्त्यावर हिरवळ नसेल तर आठ दिवसाच्या आत सर्व उपाययोजना करून पाहुण्याचे स्वागत करण्यासाठी तयार झालेला भारत काहीही करू शकतो. याची प्रचिती भारतीयांना आली. काम करण्यासाठी केवळ शासन प्रशासनाची इच्छा आवश्यक असते. म्हणजे जी ट्वेन्टी च्या नावे खाली का होईना सरकार ची कार्य क्षमता जनतेच्या लक्षात आली. कामाचा वेग, सार्वजनिक ठिकाणी ची स्वच्छता बघुन प्रत्येक भारतीय लोकांना असेच वाटत होते अशा आंतरराष्ट्रीय परिषदा दरवर्षी आपल्या देशात व्हाव्यात म्हणजे कामे तरी मार्गी लागतील. हे सर्व करत असताना मात्र सरकारने काही गोष्टी जाणीव पुर्वक लपण्याचा प्रयत्न करून आपल्या देशाची श्रीमंती, विकास दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतु सत्य हे सत्य असते. सत्य कधीच लपत नाही. आणि सत्य लपवून खोटेपणाचा दिखावा जास्त दिवस टिकत नाही. जी ट्वेन्टी परिषदेच्या माध्यमातून जेव्हा जेव्हा शहरात परिषदेचे सदस्य येणार तेव्हा तेव्हा त्या शहरातील ज्या नाल्याचे काम केले नाही असे नाले, सार्वजनिक ठिकाणचे कचरा साठवण्याच्या जागा, गोरगरीब लोकांचे संसार सरकारने लपवून ठेवले. समोरून पडदे लाऊन त्यावर ध्वज सदृश्य रंग वा फुलांचे नक्षीकाम केलेले साहित्य लावले. आणि सुशोभीकरण केलेल्या पडद्यामागे लपवला खरा भारत देश. ज्या लोकांच्या मेहनतीवर देशाची अर्थव्यवस्था आहे त्याच लोकांना पडद्यामागे लपवून देशाचा विकास दाखवण्यात आला.

देशातील वेगवेगळ्या शहरातील श्रमिक, कष्टाळू, मेहनती लोकांचे संसार एका पडल्याने झाकुन त्यांचे मुलभूत हक्क देखील त्या दिवसापुरते हिरावून घेतले. पडद्याच्या समोर कोणाला येऊ दिले जात नव्हते, सामान्य मानसाला फिरू दिले जात नव्हते. देशातील गरिबी झाकण्यासाठी जो प्रयत्न केला गेला तोच प्रयत्न गरिबांच्या जिवनावर खर्च केला असत तर सरकारला लपवालपवी करण्याची वेळ आली नसती. वर्षे भर चाललेल्या या परिषदेचा समारोपीय कार्यक्रम दिल्ली येथे पार पाडला. या कार्यक्रम अर्थात हि परिषदेचा शेवटचा भाग होय. याला अंदाजे चार हजार करोड पेक्षा जास्त खर्च झाल्याचे वृत्त समोर येत आहे. जी ट्वेन्टी च्या शेवटच्या या सभेसाठी दिल्ली बंद करण्यात आली. दिल्लीमधील सुद्धां गोर गरिब लोकांचे सुखाचे निवासस्थान झाकुन घेण्यात आले आणि त्यांना बाहेरही येऊ देण्याची मुभा दिली गेली नाही. पडद्याच्या पलीकडील गरीबी परकीय नेत्यांपासुन लपवून ठेवण्याचा मुख्य उद्देश आहे तरी कोणता? केवळ देशाचा मोठेपणा दाखवून देशातील जनतेच्या मुलभूत हक्कावर बंधने आणने, सत्य परिस्थिती लपवणे याला विकास म्हणायचे का? देशात जी ट्वेन्टी परिषद पार पडणार आणि त्यामुळे शहरातील रंगरंगोटी, स्वच्छता व सुशोभीकरण होत आहे याचा सर्वात जास्त आनंद याच गरिब लोकांना झाला. ते आर्थिक दृष्ट्या गरिब असतील कारण त्याला सरकारचे ध्येयधोरणे कारणीभूत आहेत. जर लोकांच्या गरिबीला सरकारचे ध्येयधोरणे कारणीभुत नसतील तर गोरगरीब लोकांचे सुखाचे व आनंदाचे संसार सरकारला झाकण्याची वेळ का आली. याचाच अर्थ या गोरगरीब लोकांचा पैसा सरकारनेच हडप केलेला आहे. म्हणून परदेशात आपली नामुष्कीची वेळ येऊ नाही म्हणून हा प्रकार केला



गेला. लोक सरकारच्या ध्येयधोरणामुळे आर्थिक दृष्टीने गरिब असतील परंतु राष्ट्रवाद व मेहनत या बाबतीत ते खुप श्रीमंत आहेत. तेवढा राष्ट्रवाद व मेहनत सरकारमध्ये बसलेल्या लोकांना घेणे कधीच शक्य नाही. परंतु मेहनती लोकांना पुरेसे शिक्षण, हाताला नियमित काम, पौष्टिक अन्न, आरोग्य सुविधा, चांगले निवास सरकार देऊ शकले नाही. देशात आजही कितीतरी अन्न वस्त्र निवारा या साठी संघर्ष करावा लागतो. शिक्षण व आरोग्य हे तर आजही त्यांच्या पासून दुर आहे. बाकीच्या बाबी तर त्यांच्या कल्पनेच्या बाहेरच्या आहेत. अशा या गरिब, बेरोजगार लोकांच्या देशात महागाईचा विस्फोट असताना समस्याच्या विखळ्यात अडकलेली जनता असताना परदेशी पाहुण्या साठी जेवनाची व्यवस्था केली जाते. भारतीय संस्कृती नुसार आपल्या घरी कोणताही व्यक्ती आला तर त्याचा पाहुणचार करणे आपले कर्तव्य आहे. त्यामुळे जी ट्वेन्टी परिषदेच्या निमित्ताने आलेल्या विदेशी पाहुण्यांचा पाहुणचार करणे हा आपल्या नितीमत्ता व संस्कृती चा भाग आहे. पण देशातील जनता उपाशी झोपताना, देशातील जनता महागाई मध्ये होरपळून निघताना सरकारने पाहुण्यांना सोन्या चांदीच्या ताटात जेऊ घालावे, पाणी प्यायला चांदीचे विषेश ग्लास बनवून पाहुण्यांचा पाहुणचार करणे म्हणजे उपाशी झोपणाऱ्या, डोक्यावर छत नसलेल्या बेरोजगारीचे चटके सोसणाऱ्या लोकांची थट्टाच करणे नव्हे का?भारताचे प्रधानमंत्री जेव्हा विदेशी दौऱ्यावर जातात तेव्हा त्यांच्या ही जेवणाचे फोटो व्हायरल होतात. प्रधानमंत्री विदेशात गेले तर यांना काचेचा ग्लास आणि स्टीलच्या प्लेटमध्येच जेवन मिळते. मग भारतात सोन्या चांदीचे भांडे बनवून त्यात पाहुण्यांना जेवू घालने म्हणजे सरकार ला नेमके काय सिद्ध करायचे आहे? आपली कुवत बघून खर्च करणे यात गैर नाही परंतु केवळ मोठेपणा करून स्वतः ची जाहिराती वर भर देऊ घरातील लोकांना अन्न कपडे व छत मिळत नसेल आणि त्यावर लक्ष नसेल तर हा घरातील अर्थात देशातील लोकांसोबत केलेली फसवेगिरी आहे. जनकल्याणासाठी पैसे नाहीत असे भासवणारे हे सरकार एका परिषदेसाठी चार हजार करोड पेक्षा जास्त खर्च करत असेल तर मात्र मग प्रश्न उपस्थित राहतो. गरिबांचे संसार झाकुन ज्यांना सोन्या चांदीच्या ताटात जेवन गोड लागत असेल त्या व्यक्तीकडे सर्वसामान्य लोकांविषयी काय भावना असतील? एक दिवस गरिबांचे सुखाचे संसार झाकुन सरकारला विकास दाखवावा लागत असेल तर हेच आपण मागासलेले आहोत याचे खुप मोठे उदाहरण आहे. मराठी म्हण आहे रिकाम्या भांड्याचा खणखणाट फार. रिकामे भांडे जास्तच आवाज करतात. याचाच अर्थ सोन्या चांदीच्या ताटात पाहुण्यांचा पाहुणचार करून पैशाचा दिखावा करणाऱ्या सरकारची तिजोरी रिकामी झाली आहे हेच तर सिद्ध होत नसेल ना. सरकारने ने कितीही दिखावा केला, कितीही बडेजाव करून सत्य लपण्याचा प्रयत्न केला तरीही पडद्या मागे गरिबी लपवून सोन्या चांदीच्या भांड्याचे प्रदर्शन जरी केले तरीही आम्ही विकासाच्या वाटेवर वरच्या स्थानावर आहोत हे सिद्ध करता येणार नाही. जनतेच्या पैशातून जनतेला बाजुला सारुन किती देखावा केला, प्रदर्शन केले तरी हा देखावा प्रदर्शन खुप जास्त काळ नसते. म्हणून गरिबांचे संसार झाकुन सरकार स्वतः चे कर्तृत्व दाखवत नाही तर स्वतः चे अपयश लवपत आहे हे सर्व जनतेला कळाले आहे.

# वाघिणीच्या मृत्यूने उडाली खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वाघांचा जिल्हा म्हणून जगात प्रसिद्ध झालेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील सततच्या वाघांच्या मृत्यूमुळे वनविभागात सर्वत्र खळबळ उडाली आहे. बेपत्ता झालेली वाघीन, भुकेने तडफडून मेलेले तिची तिन पिल्लं आणि दोन दिवसांपूर्वीच वाहनाच्या धडकेने ठार झालेला बिबट्या या घटना ताज्या असतांनाच आज परत मुल तालुक्यातील फिस्कुटी या गावातील एका शेतात पुन्हा एका नवीन वाघिनीचा मृतदेह आढळून आल्याने वनविभागातील खळबळ तर शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. मूल तालुक्यांतील फीस्कुटी येथील पपलु वामन शेंडे हे जगदिश गावतुरे, रा. चंद्रपूर यांची शेती करतात. आज मंगळवार ला सकाळी ७:३० चे दरम्यान महिला मजूर



निंदणीसाठी त्यांच्या शेतात गेली असता त्यांना एक वाघ मृतावस्थेत आढळला. त्यांनी ही माहिती शेतमालकाला दिली. शेतमालकाने लगेच फीस्कुटी चे सरपंचांमार्फत ही माहिती पोंभुर्णा वनपरिक्षेत्र अधिकारी यांना दिली. माहीती मिळताच वनाधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. पाहणी केली असता दोन ते अडीच वर्षाची वाघीण असल्याचे निदर्शनास आले.

नुकतेच रविवारी सायंकाळी मूल-सिंदेवाही मार्गावर वाहनाच्या धडकेत एका बिबट्याचा मृत्यू झाल्याने वनविभागात खळबळ उडाली होती. अज्ञात वाहनाच्या धडकेत या बिबट्याचा मृत्यू झाल्याचे बोलले जात होते. वनविभागाने त्या दिशेने तपास सुरू केला असतानाच आज फिस्कुटी शेतात अडीच वर्षांची वाघीण मृत अवस्थेत आढळली आहे. त्याचा तपास वनविभाग करीत आहे. सतत होत असणाऱ्या या दुर्घटनांमुळे वनविभागातील कर्मचाऱ्यांवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले असून वन्य प्राण्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. वन्य प्राण्यांची वाढती संख्या आणि त्यांचा अधिवास याची कमतरता त्यामुळे अशा घटना वारंवार घडत आहेत, अशी प्रतिक्रिया प्राणीमित्र उमेशसिंह झिरे यांनी दिली.

# पुलावरून कोसळणाऱ्या जलधारा थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** मुसळधार पावसात शहरातून जाणाऱ्या मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाण पुलाची दुरावस्था समोर आली आहे. उड्डाण पुलावरील पाईप खराब झाल्यामुळे सेवा रस्त्यांवर जलधारा कोसळतात. पाण्याचे तळे निर्माण होते. महामार्गाच्या देखभाल, दुरुस्तीवर प्रचंड खर्च होत असताना अशी दुरवस्था होण्याचे कारण काय, असा प्रश्न करीत आमदार देवयानी फरांदे यांनी शहरातील महामार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याची सूचना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला केली आहे.

अलीकडेच शहरात दमदार स्वरुपात पाऊस झाला. त्यावेळी या उड्डाण पुलाची दुरवस्था समोर आली. अनेक ठिकाणी पुलावरील पाईप खराब झालेले आहेत. त्यामुळे जलधारा थेट सेवा रस्त्यांवरील वाहनधारकांवर पडतात. इंदिरानगरच्या भुयारी मार्गात पावसाच्या पाण्याने तळे निर्माण झाल्याचे समोर आले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून रस्त्याच्या देखभालीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. पावसाळ्यापूर्वी रस्त्याच्या दुरुस्तीची ही कामे का करण्यात आली नव्हती, असा प्रश्नही फरांदे यांनी प्रकल्प संचालकांना विचारला.




# दबंग पोलिस अधिकारी चिंचोलकर यांनी कार्यभार स्वीकारताच केली धाडसी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नांदेड लातूर राष्ट्रीय महामार्गावरील प्रमुख पोलिस ठाणे म्हणून लोहा पोलिस ठाणे असून मागील कांहीं दिवसात पोलिस ठाण्यात झालेल्या विविध राजकीय उलथा पालथी नंतर कांही कालावधीतच प्रशासकीय स्तरावर बदली द्वारे लोहा ठाण्यात पोलिस अधिकारी म्हणून नायगाव पोलिस ठाण्यातून आलेले ओमकांत चिंचोलकर यांनी लोहा पोलिस ठाण्याचे सूत्र स्वीकारताच पाहिले शहरातील महामार्गावरील अतिक्रमण हटाव मोहिम हाती घेत रस्ते अतिक्रमण मुक्त केले. त्यांच्या धाडसी कार्यवाहीचे लोहा शहर वाशियातून कौतुक होत आहे. मागील कांहीं कालावधीत लोहा शहरातील कायदा व सुव्यवस्था ढेपाळली होती. संतोष तांबे यांच्या प्रशासकीय बदली नंतर सुभाष उन्हाळे यांच्या अल्प कार्यकाळ नंतर नायगाव पोलिस ठाण्यात कर्तव्य बजावलेल्या व दबंग अधिकारी अशी ओळख असलेल्या ओमकांत चिंचोलकर यांची लोहा पोलिस ठाण्यात बदली झाली. लोहा पोलिस ठाण्यात पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पदभार स्वीकारला.

त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूकीस अडचण ठरणाऱ्या अनधिकृत फेरीवाले, हातगाडे, भाजी, फळ विक्रेते गाडे, बेशिस्त वाहन धारक आदींनी प्रारंभी सूचना देवून अतिक्रमण हटाव मोहिम हाती घेतली. त्यांच्या कार्याचा लोहा शहर वशियातून स्वागत करण्यात येत आहे.

पो. नि. चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलिस ताफा शहरातील अनधिकृत फेरीवाले, हातगाडे व बेशिस्त वाहन पार्कींगवर कार्यवाही करताना दिसून येत आहेत. शहरातील व्यापाऱ्यांनी दुकानासमोर रस्त्यावर दुकानातील समान साहित्यांची आरास केल्यामुळे पादचाऱ्यांसह वाहतुकीस अडथळा ठरत असल्यामुळे प्रारंभी चिंचोलकर यांनी वाहतूक कोंडी विषय हाती घेतल्याचे बोलले जात आहे. पो. नि. चिंचोलकर यांच्या समवेत स पो नि चन्ना, पोउपनि मारोती सोनकांबळे, हालसे सह अशोक केंद्रे, सदानंद जामकर, कैलास गिरे पाटील सह बहुसंख्य पोलिस कर्मचारी उपस्थित होते. पो. नि. चिंचोलकर यांची पुढील कार्यवाही कुणावर होणार याकडे शहर वाशियांचे लक्ष लागून असले तरी अनधिकृत व्यावसायिक मंडळींनी पोलिस कार्यवाहीचा धसका घेतल्याचे दिसून येत आहे.

# सद्धम्म प्रबोधन विपश्यना प्रशिक्षण केंद्राची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**नांदुरा :** १० सप्टेंबर रोजी नांदुरा तालुक्यातील लोणवडी येथे सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केंद्राची बैठक पार पडली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आणि भगवान बुद्ध यांच्या प्रतीमांना पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. लोनवडी( डँम) येथे धंम्म प्रशीक्षण केंद्य व मेडीटेशन सेंटर उभारण्यात येत असून त्यासाठी विविध समित्यांचे गठिन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संतोष तायडे यांनी सर्वांना ओळखपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच या बैठकीमध्ये प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्याकरता लागणारे साहित्याचे फित कापून उद्घाटन केरण्य आत आले. आलेल्या सर्व माण्यवराचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. यावेळी गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये ॲड. माणिकराव पवार विधी व न्याय समितीचे अध्यक्ष, गोविंद वाघ व्यवस्थापकीय अध्यक्ष सुनंदाताई नितनवरे महिला संघ अध्यक्ष, श्रीकांत गोंडाणे सल्लागार समिती अध्यक्ष, श्रीलेखा नगराळे आर्किटेक, डॉक्टर प्रज्ञा वाघ आरोग्य समिती अध्यक्ष,




दिनकर वाकोडे बांधकाम समिती अध्यक्ष, शिवपाल नितनवरे सायबर समिती अध्यक्ष यांची निवड करून सर्वांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संतोष तायडे यांनी सांगितले की,आपलि परिसरात आपण भव्य दिव्य असे धम्म प्रशीक्षण व मेडिटेशन सेंटर उभारत असून त्यामुळे आपण विविध उपक्रम सुरू करणार आहोत.त्यासाठी आपण सर्वांनी या कामात सर्वतोपरी सहकार्य करावे. यावेळी प्रभाकर इंगळे कार्यालयीन सचिव, राजेश इंगळे सहसचिव, पर्यावरण अध्यक्ष निवृत्ती धुरंदर, स्पर्धा परीक्षा वर्ग अध्यक्ष राहुल इंगोले, सायबर समिती अध्यक्ष वसंता ठाकरे वृद्धाश्रम समिती अध्यक्ष सुरेश हिवराळे अनाथालय समिती अध्यक्ष, गुलाबराव तायडे अध्यक्ष स्वच्छता नियोजन समिती, काटे सर ,नीरज सर आर्किटेक छत्तीसगड, मुकेश तायडे अमोल तायडे या सर्वांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर इंगळे यांनी तर आभार प्रदर्शन भीमराव कळस्कर यांनी केले.

# बहिणीला त्रास देणाऱ्या मेहुण्याचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बहिणीला त्रास देणाऱ्या मेहुण्याच्या डोक्यात गज मारुन खून करण्यात आल्याची घटना बाणेर भागात मंगळवारी घडली. मेहुण्याचा खून केल्यानंतर तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. धनंजय साडेकर (वय ३८) असे खून झालेल्याचे नाव आहे. साडेकर यांचा खून केल्यानंतर हेमंत काजळे (वय ४०) याने गळफास घेऊन आत्महत्या केली. बाणेरमधील श्री समृद्धी सोसायटीत ही घटना घडली. धनंजय साडेकर यांचा हेमंत काजळे याच्या बहिणीशी विवाह झाला होता. विवाहानंतर साडेकर दाम्पत्यात वाद झाले.

# महिला शेतकऱ्यांना कृषी विद्यापीठात कडधान्य व तृणधान्य प्रक्रिया उद्योगाबाबत मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील कृषी प्रक्रीया अभियांत्रिकी शाखेचे विभाग प्रमुख डॉ.प्रमोद बकाने व कृषि विभाग सोयगाव येथील कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, आत्मा अंतर्गत कार्यरत तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक अमोल महाजन यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय शेतकरी महिला प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन दि.११सप्टेंबर २०२३ रोजी डॉ.विकास खर्चे संशोधक संचालक व डॉ.सुरेंद्र काळबांडे अधिष्ठाता, डॉ.पंदेकृवि, अकोला यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले तसेच सदरील तीन दिवसीय प्रशिक्षणात दाल मिल उद्योग, कृषि प्रक्रीयेसाठी अक्षय



उर्जेचा वापर, बियाणे प्रक्रिया, तेलबिया प्रक्रीया, तृणधान्याचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, आरोग्यवर्धक खाद्यपदार्थाची निर्मिती या विषयांवर विविध तज्ञांच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी निधीची पुर्तता प्रकल्प संचालक आत्मा, औरंगाबाद बी.एस.तौर व प्रकल्प उपसंचालक आत्मा, औरंगाबाद अनिल कुलकर्णी यांचे मार्फत करण्यात आली.

# विद्यार्थ्यांनो ध्येय गाठण्याची जिद्द बाळगा : आ. किशोर जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिक्षणामुळे आयुष्यात सकारात्मक विचारांचा संचार होतो. नकारात्मक विचार दूर होतात. शिक्षण ही विकासाची प्रक्रिया आहे. त्यामुळे उच्च शिक्षित होऊन या प्रक्रियेचा भाग बना, महाविद्यालयीन जिवन तुमच्या आयुष्यातील सुर्वण काळ आहे. याचा उपयोग योग्य करत विद्यार्थ्यांनो ध्येय गाठण्याची जिद्द बाळगा असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. सरदार पटेल महाविद्यालय गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सुधा पोटदुखे, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, प्राचार्य डॉ. पी. एस. काटकर, सदस्य दिनेश पटेल, उपप्राचार्य माधव शेट्टीवार, सांस्कृतिक प्रमुख सुमेधा श्रीरामे आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, आईवडिल आणि गुरुजनांनी केलेले संस्कार कधीही विसरू नका. आपली प्रतिमा आपल्यालाच निर्माण करावी लागते. आपल्या जीवनात समाजाचे स्थान महत्त्वाचे आहे, त्यामुळे समाजाला परत द्यायला शिका. जसे मोठे व्हाल तसे आमिषांपासून, व्यसनांपासून दूर राहा. तुमचे वय स्वप्न बघण्याचा आहे, परंतु हे स्वप्न पुर्णत्वास नेण्याची क्षमता स्वतःमध्ये निर्माण करा. महाविद्यालयीन जिवन आयुष्यातला सर्वात सुंदर काळ आहे. हा काळ उत्तम भाविष्य घडविण्यात घालवा, आपण 11 वी आणि 12 वीचे विद्यार्थी आहात येथुन तुमच्या जिवनाची पुढची दिशा ठरणार आहे. आयुष्याला यशस्वी वळण मिळेल असे नियोजन आपण यावेळी केले पाहिजे असे ते यावेळी म्हणाले. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून आम्ही विविध उपक्रम सुरु केले आहे. मतदार संघात 11 अभ्यासिकांचे आपण निर्माण करत आहोत. या अभ्यासिकांमध्ये विद्यार्थ्यांना निःशुल्क अभ्यास करता येणार आहे. आज येथे गुणवंत विद्यार्थांचा सत्कार केला गेला आहे. आपण शिक्षणात मिळविलेल्या यशाची ही पावती आहे. या सत्कार सोहळ्यातुन नवी ऊर्जा घेऊन उंच शिखर गाठा असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# महावितरण कार्यकारी अभियंता यांच्या लेखी पत्रानंतर आमरण उपोषण मागे

आधुनिक केसरी न्यूज



**चारठाणा :** येथील नागरिकांनी दि.४ सप्टेंबर रोजी अधीक्षक अभियंता परभणी यांना लेखी निवेदन दिले होते. त्यात असे नमूद करण्यात आले की चारठाणा येथील सिंगल फेज सुरू करणे,महावितरण चे शाखा कार्यालय बंद ते सुरू करणे, अचानक लादलेली लोड शेडिंग बंद करणे, गावातील रोहीत्र (डीपी)ची दुरुस्ती, फ्युज बॉक्स बसवणे, ६३ वर्षांपासून असअसलेल्या विद्युत तारा बदलणे,लाईनमेन सह कर्मचारी स्टाप देणे, बाहेरून ये जा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मुख्यालय राहण्याचे आदेश देणे असा विविध समस्यांची मागण्या मान्य करण्याचे निवेदन देण्यात आले होते तरी पण यावर महावितरण कंपनीकडून व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून काहीच ऊपाय योजना आमलात आणली गेली नव्हती. या कारणास्तव येथील ३३ के.व्ही. उउपकेंद्रासमोर दि.११ सोमवार रोजी सकाळी११वा. येथील महावितरणच्या विविध मागण्या मान्य व्हावेत या करीता किरण देशमुख, किसनप्रसाद खाडे, प्रभाकर कुऱ्हे, सय्यद मुस्ताक अहमद, सुधाकर क्षिरसागर, शकंर राठोड यांच्यासह आदींनी आमरण उपोषण सुरू केले. या दरम्यान येथील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विनोद साने, बीट जमदार यु.टी. सातपुते ऊमेश बारहाते, सुधाकर कुटे, पो.कॉ. पवन राऊत यांनी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला. यावेळी या दरम्यान उपोषण स्थळी जिंतूरचे उपअभियंता ए.डब्ल्यू. कामडी सहाय्यक अभियंता एस.एच. गव्हाणे, एस.ए. कवडे आदींनी भेट देऊन उपोषणकर्त्यासोबत चर्चा केली तसेच कार्यकारी अभियंता यांच्या सही चे लेखी पत्र व उपोषणकर्त्यांना पाणी पाजून ६ तासांनी उपोषण मागे घेतले आहे. लाईनमेन बोकन, बाबासाहेब मेहेत्रे, एकनाथ आवचार, शेख शफिक, शेख जब्बार, एकबाल काजी, पप्पू देशमुख, जनार्दन राऊत, नरेश खाडे, सय्यद अजहर, श्रीपाद देशपांडे, अमजद पठाण अजय देशमुख, शिवा बोकन गेंदेखॉ पठाण, एकनाथ इंगळे, विलास मेहेत्रे, परमानंद भवरे, लाईनमेन गुट्टे आदींची उपस्थिती होती.

# सोयाबीनवर पिवळा मोझॅक, उंट अळीचे आक्रमण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात धान, कापसापाठोपाठ सोयाबीनचे मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. सध्या सोयाबीन फुलोरा, दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत. चांगल्या अवस्थेत असलेल्या सोयाबीनवर सध्या काही ठिकाणी पिवळा मोझॅक, तर काही ठिकाणी उंट अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. कापसावर डोमकळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. कापसावर डोमकळी येणे म्हणजे गुलाबी बोंडअळीची ही पहिली अवस्था आहे. कापसावर डोमकळीचा प्रादुर्भाव नगण्य असून सोयाबीनवर मोठ्या प्रमाणावर पिवळा मोझॅक आहे. सोयाबीन हे नगदी पीक आहे. याच पिकावर पिवळा मोझॅक, उंटअळीचा प्रादुर्भाव असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात धान, सोयाबीन आणि कापसाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. गेल्या काही वर्षांपासून सोयाबीन, कापसाला चांगला भाव मिळत आहे. त्यामुळे या दोन्ही पिकांच्या क्षेत्रात गेल्या काही वर्षांत वाढ होत चालली आहे. खरीप हंगामात सोयाबीन ६६ हजार ९३१ हेक्टरवर, तर कापूस १ लाख ७५ हजार २६९ हजार हेक्टर क्षेत्रावर आहे. जिल्ह्यात जुलै, आगस्ट महिन्यात दमदार पाऊस झाला. हा पाऊस या दोन्ही पिकांसाठी पोषक ठरला. सोयाबीन फुलोरा आणि दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत. याच अवस्थेत सध्या भद्रावती, वरोरा आणि चिमूर तालुक्यात पेरलेल्या सोयाबीनवर पिवळा मोझॅकचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव आढळून आला आहे. पिवळा मोझॅक हा बियाण्यांमार्फत पसरतो. विषणूजन्य हा रोग आहे. मात्र, या विषाणूजन्य व्हॉयरसवर औषध नाही. यावर उपाययोजना म्हणून बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे.पांढऱ्या माशीमुळे हा रोग होतो. त्यामुळे यावर नियंत्रण करणे आवश्यक आहे. सोयाबीनवर पिवळा मोझॅकचा प्रादुर्भाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने गावागावांत जाऊन जनजागृती करणे सुरू केले आहे.

# कर्ज वाटपात ग्रामीण बँकेची आघाडी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेने पीक कर्ज वाटपात सावळदबारा परिसरात आघाडी घेतली आहे. एकीकडे शेतकऱ्यांना बँका पीक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याची ओरड शेतकऱ्यांमधून होत असतानाच महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या सावळदबारा शाखेत पीक कर्ज वाटपात ग्रामीण बँकेने मोठी आघाडी घेतली. या शाखेने तब्बल १०० टक्के पीक कर्जाचे वाटप करून अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. लोकप्रतिनिधी, अधिकारी वारंवार बैठका घेऊन शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्याबाबत बँकांना सूचना देतात. शिवाय, शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेत वाटप नाही केल्यास, उद्दिष्ट अपूर्ण राहिल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारा देखील दिला जातो. परंतु, बँकांकडून मात्र वेगवेगळी कारणे पुढे करत पीक कर्ज देण्यास टाळाटाळ केली जाते, असा अनेक शेतकऱ्यांचा अनुभव आहे. विशेष म्हणजे, बँकेच्या ठरलेल्या एजंटामार्फेत गेले तरच कर्ज मिळते, अशीही काही शेतकऱ्यांची तक्रार आहे. परंतु, या सर्व बाबींना महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा अधिकारी मयूर सोनटक्के अपवाद ठरली आहे. या बँकेच्या कार्यक्षेत्रात सावळदबारा गावासह डाभा, मोलखेडा, हिवरी, देव्हारी, घाणेगांव तांडा, पिंपळवाडी, चारुतांडा, घाणेगाव तांडा, टिटवी, नादांतांडा, देव्हारी, नांदगाव, तोरनाळा, पळसखेडा, घाणेगाव, महाल्बदा ही अठरा गावे येतात. या बँकेचे दोन हजार पाचशे खातेदार आहेत. यावर्षी **या बँकेला पीक कर्ज वाटप**

प्रत्यक्षात १ हजार २०० शेतकऱ्यांना १० कोटी ५० लाख रुपये पीक कर्जाचे वाटप केले. एकूण उद्दिष्टापेक्षा हा आकडा अधिक असून, यामुळे कोरोना, पाऊस यासारख्या नैसर्गिक संकटामुळे अडचणीत सापडलेल्या गरजू शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे.

**केवळ कागदपत्रे पाहून कर्ज वाटप**

महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखाधिकारी मयूर सोनटक्के हे पीक कर्ज देताना नेहमीच सहकार्याची भूमिका ठेवतात. कुठल्याही मध्यस्थाशिवाय केवळ कागदपत्रे पाहून तातडीने पीक कर्जाचे वाटप केले जात असल्याने शेतकऱ्यांना मोठा आधार मिळत असल्याचे शिवाजी बुढाळ माजी जिल्हा परिषद सदस्य,प्रा. जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते,प्रा मदन डोखळे, गणेश शिनगारे,अनंता गायकवाड मोलखेडा या शेतकऱ्यांनी सांगितले.

# पूरग्रस्त संतोष सोनोने यांचा जलसमाधीचा प्रयत्न

## प्रश्न सुटले नाहीत तर मंत्रालयावर आंदोलन : प्रशांत डिक्कर

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** ५० दिवसा अगोदर झालेल्या अतिवृष्टीनंतर हजारो शेतकऱ्यांनी आपत्तीग्रस्त नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कसलीही शासकीय मदत न मिळाल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर हे २८ ऑगस्ट रोजी अन्नत्याग आंदोलनाला उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बसले होते. त्यानंतर ३० ऑगस्ट रोजी ते अन्नत्याग मंडपातून भूमिगत झाले आणि चार सप्टेंबरला आत्मदहनाच्या इशाऱ्यानंतर ते उपविभागीय अधिकारी कार्यालय समोर उपस्थित झाले. त्यांचे कडून सर्व शपथपत्रावर लिहून घेतले आणि ८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी बैठक लावली. परंतु राजकीय दबावात ही बैठक रद्द करण्यात आली. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे, अशी भूमिका इथले लोकप्रतिनिधी अधिकाऱ्यांच्या बाबतीत घेतात आणि त्यामुळे शेतकरी आणि आपत्तीग्रस्तांचे प्रचंड नुकसान होते. तालुक्यातील आसलगाव येथील संतोष सोनोने आणि इतर २५ शेतकऱ्यांनी सानुग्रह अनुदान न मिळाल्यामुळे तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता, परंतु तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांना दमदाटी करून तिथे आमरण उपोषणाला बसण्यापासून वंचित केले. त्यांची मानसिकता ढासळली आणि त्यांनी दि. ११ सप्टेंबर रोजी मानेगाव येथील पूर्णा नदीच्या मोठ्या पुलावरून जलसमाधी घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी नदीमध्ये उडी घेतली, नदीपात्रालगत असलेल्या मंडळींनी पुरात उडी घेऊन त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला व त्यांना खामगाव येथे सामान्य रुग्णालयात दाखल केले, असे कित्येक संतोष सोनवणे आर्थिक मदतीपासून वंचित आहेत. तरीपण स्थानिक उपविभागीय अधिकारी काळे आणि तहसीलदार शितल सोलाट ह्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाप्रती उदासीन आहेत.

संतोष सोनोने व इतर २५ शेतकऱ्यांचे निवेदनावर तहसीलदार सोलाट यांचा ६ संप्टेबर रोजी प्रत्यक्ष शेरा आहे. स्वाभिमानीचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात जाऊन संतोष सोनवणे यांची प्रत्यक्ष भेट घेतली, त्यांच्या तब्येतीची चौकशी केली आणि अशा प्रश्नासाठी शेतकऱ्याने जलसमाधी घेणे योग्य नाही. आपण यासाठी तीव्र आंदोलन करू उद्या आपण जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेणार असून येत्या ८ दिवसात आमचा प्रश्न मार्गी लागला नाही तर हजारो शेतकऱ्यांसह मंत्रालयावर आंदोलन करून ह्या भागातील पूर पिढीत आपत्तीग्रस्त वंचित शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळवून दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

# सुगराबी देशमुख यांची सरपंचपदी बिनविरोध निवड

## उपसरपंचदी सुदाम आव्हाड : गुलाल उधळून समर्थकांचा जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज



**घनसावंगी :** तालुक्यातील घोन्सी बुद्रुक या गावातील सरपंच पदाची निवडणूक मंगळवारी संपन्न झाली. सुगराबी पाशामिया देशमुख यांची गावाच्या सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्या समर्थकांनी गुलाल उधळून जल्लोष केला. उपसरपंचदी सुदाम आव्हाड बनले आहे. जामसमर्थ येथील मंडळ अधिकारी एस.एस. बोटुळे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. श्रीमती मीरा श्रीराम बेरगळ यांचा अडीच वर्षाचा कार्यकाळ संपला असल्याने त्यांनी राजीनामा दिल्यानंतर आज दुपारी ग्रामपंचायत कार्यालय येथे निवडणूक झाली. विरोधात कोणत्याही सदस्यांनी सरपंच व उपसरपंच पदासाठी अर्ज दाखल केला नसल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सरपंच व उपसरपंच पदाची निवडणूक बिनविरोध झाल्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत माजी सरपंच तथा सदस्य मीरा बेरगळ, सुदाम आव्हाड, जनाबाई बिगरे, चंद्रभागाबाई टेहळे व गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे. महिलेच्या हाती पुन्हा गावाचा कारभार आल्याने सुगराबी यांनी गावाच्या विकासासाठी काम करणार असल्याची प्रतिक्रिया दिली. तलाठी तुषार गायकवाड, ग्रामसेवक एस.एम.माने यांनी निवडणूक कामी सहकार्य केले. सरपंच व उपसरपंच जनविकास आघाडीचा विराजमान झाल्याने माजीमंत्री राजेश टोपे, पैनल प्रमुख तथा जिल्हा परिषद सदस्य जीवन वगरे व मौलाना एजाज देशमुख यांनी विशेष अभिनंदन केले. याप्रसंगी माजी सरपंच पाशामिया देशमुख, रामा वगरे, तुकाराम माने, माजी सरपंच बख्तियार भाई, मुख्याध्यापक विक्रम कोळेकर, फारुख देशमुख, पोलिस पटेल शेरू पटेल, मुन्शी पटेल, मिनाज देशमुख, मोईज देशमुख, मतीन पटेल, अब्दुल रहेमान, अतिक बाबूलाल पटेल, रसुल पटेल, जुम्मा पटेल, वासेब शेख, अकील बाबू शेख, शरीफ शेख, रुमखा पटेल, नय्यूम पटेल आदींनी अभिनंदन केले आहे.

# पावसाने उघडीप देताच फवारणीला वेग

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी पाऊस उघडताच शेतकऱ्यांनी पिक अंतर्गत कामे आटोपती घेण्याचा सपाटा लावला आहे. कापसावर औषधी फवारणी खते टाकणे गवत काढणीला वेग आला आहे. गत महीनाभरापासून पावसाने खंड दडी मारल्याने खरिप पिके वाळण्याच्या मार्गावर होते. तर पुर्वा नक्षत्राच्या पावसाने आगमान करुन तीनचार दिवस संततधार लावून धरल्याने खरिप पिके चांगली टवटवीत हिरवीगार झाली आहे.जाण्याच्या मार्गावर असलेले खरिप पिकांना जीवदान मिळाले पाऊस पोषक ठरलं त्यामुळे शेतकऱ्यातुन आनंद व्यक्त करण्यात येत आहे. पावसाची उघडीप मिळताच शेतकऱ्यांनी कापसावर व पिकांवर रासायनिक औषधी फवारणी करणे गवत काढणी विविध पिक अंतर्गत कामे आटोपती घेत असल्याचे चित्र आहे. झालेल्या पावसाने शेतकरी वर्ग जाम खुश झाला आहे.

# सावंगी येथे यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील विद्यार्थ्यांनी डॉ.सी व्ही रमण बाल वैज्ञानिक परिक्षात खुलताबाद तालुक्यात प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक पटकावला त्यांचे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ येथे प्रमाणपत्र मेडल आणि प्रोजेक्ट किट देवून गौरविण्यात आले. तर बाजार सावंगी येथे ही जिल्हा परिषद प्रशाळेत तालुक्यात प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक तथा पात्र विद्यार्थ्यांनी डॉ. सीव्ही रमण बालवैज्ञानिक परिक्षेत यश मिळवल्याने त्यांचे शाळेतील मुख्याध्यापक हरिभाऊ दहीफळे व शिक्षकवृंद यांनी सत्कार अभिनंदन करत सन्मानित करण्यात आले. सर्वांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आम्ही फक्त मुरमाच्या ट्रिप टाकतो; तुम्ही मजूर सांगून उचलून टाका

## सी.ओ. : पुराच्या पाण्याने खड्डा पडल्याने जळगाव शहरातील १५० गावांची पाईपलाईन उघडी

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** लोकप्रतीनीधी असो किंवा अधिकारी असो हे लोक जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असावेच लागतात. कुठलाही मोठा अधिकारी असो त्याला जनतेचे काम करण्यासाठीच पगार भेटतो. पण काही अधिकारी आपल्या पदाला योग न्याय देत नाहीत. लोक त्यांच्या ऑफिसमध्ये मोठ्या आशेने छोटी-मोठी कामे घेवून येतात. पण हे महोदय त्याची पाहिजे तशी दखल घेत नाही. त्या बिचाऱ्या लोकांना अनेक चकरा माराव्या लागतात पण साहेब हो तुमच काम लगेच मार्गी लावतो असे गोड बोलून त्यांना वापीस पाठवतात.

असाच काहीसा प्रकार जळगाव शहरात झालेला आहे. पोलीस स्टेशनच्या पठीमागे इदगाह असून त्याचा पाठीमागे एक नाला वाहतो.नाला सिमेट कॉंक्रीटीकरने बांधलेला आहे. तो नाला आमदार साहेबांच्या घरासमोरूनही जाते.इदगाहच्या पाठीमागील त्या नाल्याच्या काठाला लागूनच लोकांची घरे आहेत. २२ जुलैच्या महापूराने अनेकांच्या घरात पाणी शिरले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर त्या लोकांचे नुकसान झाले.त्या महापूराने नाल्याच्या काठाला लागूनच असलेल्या रस्त्यावरून त्या लोकांना जावे लागते. पुराच्या पाण्याने तीथे मोठा खंड्डा पडला असून लोकांचे येने जाने तेथू बंद झाले आहे.पुराने खड्डा पडल्याने १५० गावाची जळगाव शहरातील पाईप लाईन उघडी पडली आहे. त्या पाईप लाईनला सुद्धा धोका निर्माण झाला आहे. एखाद्या माथेफिरू इसमाने जर तो पाइप फोडला तर संबंधित विभाग आणि लोकांना नाहक त्रास भोगावा लागेल. तो खोल खड्डा बुजवण्यासाठी महिलांनी जळगाव जामोदचे सी.ओ. साहेबांना निवेदनही दिले आहे. मी पत्रकार या नात्याने त्यांना याबाबतीत फोन करून माहिती दिली. खड्डा पडलेल्या जागेचा विडिओ काढून साहेबांच्या व्हाट्सएपवर पाठवला व प्रत्यक्ष जावून भेटलोही. साहेबांनी तो खड्डा बुजवण्यासाठी मुरमाच्या जेवढ्या ट्रीपा लगतील तेवढ्या आम्ही पाठवतो. तुम्ही त्या परिसरातील लोकांना सांगून जिथ खड्डा पडलेला आहे तिथे त्यांना



टाकायला सांगा. आम्ही फक्त मुरूमच टाकू तुम्हाला तो उचलून सदर खंड्डा बुजवावा लागेल. मजूराचे आम्ही सांगू शकत नाही आणि त्यांचे पैसे पण देवू शकत नाही. अशा शब्दात त्यांनी माझे सांत्वन केले. दुसऱ्या दिवशी सी.ओ. साहेबांनी जीथ चार ते पाच मुरमाच्या ट्रीपा लागतात तीथं दोन मुरमाच्या ट्रीप टाकल्या आहेत. आज मुरमाच्या ट्रीपा टाकून दहा दिवस उलटून गेले आहे. बिचाऱ्या लोकांनी त्यातील काही मुरूम स्वतःच उचलून घरासमोरील खड्यात टाकला असून बाकिचा मुरून अजूनही तिथेच पडून आहे.

लोक अजूनही सी.ओ. साहेबांच्या मुरमाच्या ट्रीप दोन तीन ट्रीप येतील व त्यांचे मजूर येवून तो खंड्डा बुजवतील या भाबड्या आशेवर बसलेले आहेत. त्याच नाल्यावर अगदी हाकेच्या अंतरावर विद्यमान आमदार डॉ. संजय कुटे साहेबांचे घर आहे, त्यांच्या घराच्या समोर जर त्या पुरामुळे एखादा छोटा मोठा खंड्डा पडला असता तर नगरपालिकेचे सी.ओ.साहेबांनी आतापर्यंत तो केव्हाचाच बुजवून टाकला असता हे कुणालाही सांगण्याची गरज नाही. सी.ओ. साहेब आपण जनतेची काम करण्यासाठी आहात. आपण आतातरी तो खड्डा तात्काळ बुजवावा लोकांना होनारा त्रास थांबवावा.




# जालना लाठीहल्ल्याचा कामोठ्यात निषेध; सकल मराठा समाजाची मूक निदर्शने

## राज्य सरकारला बेमुदत उपोषणाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषण दरम्यान उपोषणातील आंदोलकांवर झालेल्या भ्याड लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ कामोठ्यात नुकतीच निदर्शने करण्यात आली. यावेळी या घटनेमुळे २०१८ मध्ये कळंबोली येथील सायन-पनवेल द्रुतगती महामार्गावर झालेल्या आंदोलनात मराठा समाजातील ९७ युवकांवर ३०७ व ३५३ सारखे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हे गुन्हे तात्काळ राज्य सरकारच्या वतीने मागे घेण्यात यावेत,कारण संबंधित ३०७ व ३५३ सारखे गंभीर गुन्हे दाखल असल्यामुळे मराठा समाजातील युवकांना नोकरी व शिक्षणात अडचणी येत आहेत.त्यामुळे हे गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावे,अशी मागणी मराठा तरुणांकडून करण्यात आली.

सकल मराठा समाजाकडून मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी अनेक आंदोलने शांततेच्या मार्गाने झाली. मराठा समाजाच्या पदरात पुन्हा एकदा निराशा हाताला लागलेली आहे. मात्र पुन्हा अंतरवली सराटी गावचे सुपुत्र मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाचा आवाज बुलंद केला आहे.त्यांना सर्व स्तरातून समाजाचा पाठिंबा मिळत आहे. शांततेत आरक्षणाची मागणी करणाऱ्या मराठा बांधवांचा समाज बांधवांनी अंत पाहू नये, असा इशारा सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला. मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करून घटनात्मक व कायदेशीर आरक्षण देण्याची मागणी करण्यात आली. कामोठे, कळंबोली मधील गंभीर गुन्हे मागे घेण्यासंदर्भात राज्याच्या गृहमंत्र्याबरोबर १५ दिवसांच्या आत आंदोलकांची विशेष बैठक लावावी, अन्यथा परिसरातील मराठा युवक २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती पासून बेमुदत उपोषणाला बसतील, असारा इशारा मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला.

# प्रकाश वाकळे यांच्या हस्ते शाळेचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** प्रशांतजी बंब यांच्या शिफारशीनुसार जिल्हा नियोजन समिति (डी.पी.टि.सी) विभागामार्फत भडजी येथे तीन नवीन शाळा खोल्यांचे भूमिपूजन सरपंच बाबासाहेब वाकळे, व भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गवळे यांच्या हस्ते करण्यात आले.

शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गवळे यांनी शालेय समितीच्या बैठकीत ठराव घेऊन नवीन शाळा खोल्यांची मागणी आमदार प्रशांत बंब साहेब यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती आमदार प्रशांत बंब यांनी विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून तातडीने या विषयावर लक्ष घालून जिल्हा नियोजन विभागाला पत्र देऊन नवीन तीन शाळा खोल्या देण्यात याव्यात असे सांगितले. तत्काळ नियोजन समितीने तीन नवीन वर्ग खोल्या 36 लाख रू मंजूर करून देण्यात आल्या. या शाळा खोल्यांच्या भूमिपूजन प्रसंगी सरपंच बाबासाहेब वाकळे, उपसरपंच राजु वाकळे, भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब वाकळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर गवळे, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र वाकळे, गणेश घोडके,बद्रीनाथ वाकळे, आप्पाराव वाकळे, काशिनाथ वाकळे, कडुबा वाकळे, कासम शेख, ताजु शेख, बाबासाहेब पवार, कृष्णा चव्हाण, विठ्ठल वाकळे, विश्वनाथ वाकळे, अनिल कसारे, शाईनाथ वाकळे, देवमन पुसे तसेच गावातील नागरिक उपस्थित होते सरपंच बाबासाहेब वाकळे व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गवळे यांनी आमदार प्रशांत बंब साहेब याचे गावकऱ्यांच्या वतीने आभार व्यक्त केले.



# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सिग्नलची उभारणी

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल :** पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. नुकतेच आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरीक्त आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या सूचनेनूसार आदई सर्कल व स्वर्णगंगा चौकामध्ये याठिकाणी महापालिकेने सिग्नलची उभारणी करण्यात आली आहे.या सिग्नल व्यवस्थेमुळे स्वर्णगंगा चौक वआदई सर्कल चौकामध्ये नित्य नेमाने होणारी वाहतुकीची कोंडी सुटली आहे.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून दोन ठिकाणी सिग्नल व्यवस्था उभारण्यात आली आहे. यामध्ये प्रथमतः आदई चौकामध्ये सिग्नल बसविण्यात आला आहे. पनवेल- माथेरान रस्त्यांवरील आदई चौकातून पनवेल शहराकडे मोठ्या प्रमाणात वाहनांची येजा सुरु असते. सकाळी व संध्याकाळी याठिकाणी विविध कंपन्याच्या बसेस,तसेच चाकरमान्याच्या गाड्यामुळे वाहनांची वर्दळ वाढल्यामुळे या चौकात सातत्याने वाहतुक कोंडी होत होती. त्यामुळे या चौकामधून भरधाव वेगाने वाहनांची येजा सुरू असते. दरम्यान अपघात होण्याची शक्यताही नाकारता

> विद्युत विभागाच्या माध्यमातून महापालिका कार्यक्षेत्रात सध्या विविध कामे हाती घेतली आहेत . सिडको हस्तांतरीत भागात जुने पारंपारिक दिवे बदलून नवीन एलईडी दिवे लावण्यात आले आहेत .याचबरोबरीने काही महत्वांच्या चौकांमधील वाहतुकीची कोंडी लक्षात घेऊन मा . आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सिग्नल जंक्शन उभारण्यात आले आहे . या सिग्नल जंक्शनमुळे वाहतुकीला शिस्त लागणार आहे .
> **प्रितम पाटील, विभागप्रमुख विद्युत विभाग पनवेल महानगरपालिका**

येत नव्हती. महापालिकेने ही समस्या दूर करण्यासाठी विद्युत विभागाच्या माध्यमातून नुकतीच आदई चौकामध्ये सिग्नल जंक्शनची उभारणी केली आहे.

याचबरोबर खारघर क्षेत्रातील सेक्टर १५ येथील स्वर्णगंगा चौक कोपरागावाकडे जाणाऱ्या सायन-पनवेल महामार्गास जोडण्यात आला आहे.या चौकामधून मोठ्याप्रमाणात खारघर शहराकडे वाहनांची येजा सुरू असते.या चौकामध्ये वाहनांची संख्या वाढली, असल्याकारणाने याठिकाणी वारंवार वाहतुक कोंडीची समस्या उद्भवत होती. या चौकामधून सायन –पनवेल महामार्गाकडे जाताना भरधाव वेगाने वाहनांची येजा सुरू असते. सुरक्षितेतेच्या दृष्टीने व वाहतुकीचे नियमन करण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागच्या दृष्टीने सिग्नल जंक्शन स्थापित करण्यात आले आहे.





# वैजापुरात संत शिरोमणी संत सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील सकल नाभिक समाजाच्या वतीने संत शिरोमणी संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त संत सेना समाज मंदिरात अभिषेक, महाआरती, भजन, कीर्तन, महाप्रसाद असे विविध कार्यक्रम सोमवार(ता.११)रोजी आयोजित करून संत शिरोमणी संत सेना महाराज यांना अभिवादन करण्यात आले. पालिकेच्या नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी, आमदार बोरनारे यांच्या पत्नी सौ. संगीता बोरनारे यांनी प्रथम आरती आरंभ केली. या समयी दशरथ बनकर, सौ. माधुरी बनकर, दिनेश राजपूत, सौ.जयश्री राजपूत, ज्ञानेश्वर टेके, सौ. ज्योती टेके तसेच सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिह राजपूत, स्वप्नील जेजुरकर, राजेश गायकवाड, शैलेश चव्हाण, शैलेश पोंदे, साहेबराव मापारी यानी आरती केली. या समयी सौ. शालिनीताई इंदोरीकर यांचे कीर्तन ही झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पवन विश्वासु, रवी अनर्थे, रघुनाथ जाधव,संतोष गायके, शिवाजी अनर्थ, ऋषी अनर्थे, इंद्रजित जाधव, दत्तात्रय अनर्थे, सुधाकर आहेर, दिलीप अनर्थे, बाबासाहेब जगताप, गणेश अनर्थे (भायगाव), गं.भा. आशा अनर्थे, सुशीला अनर्थे, नीता अनर्थे व सकल नाभिक समाजाच्या महिला व पुरुष युवक, युवती यांनी विशेष प्रयत्न केले.



# सरकारमधील मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही

## मनोहर खाळपे : धनगर समाजाचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** धनगर समाजाच्या वतीने तहसीलदार मॅडम जळगाव जामोद यांना ११ सप्टेंबर रोजी विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यामध्ये धनगर आरक्षणाची अमल बजावणी करण्यात यावी व मेंढपाळ बांधवांना शेळ्या मेंढ्या साठीकर्ज स्वरूपात 10000 कोटी रु.आर्थिक तरतूद करून त्यांना तात्काळ कर्ज स्वरूपात रक्कम देण्यात यावी. धनगर समाजाला अनुसूचित जमातीसाठी लागू असलेल्या सर्व सोयी सवलतीची अंमलबजावणी करण्यात यावी. महाराष्ट्रातील मेंढपाळ बांधवांना चराई पासेस व चराई कुरणे देण्यात यावी तसेच मा.मंत्री महोदय विखे पाटील यांच्यासमोर धनगर समाजाच्या कार्यकर्त्याला मारहाण झाली. त्याचा निषेध सुद्धा करण्यात आला.

यावेळी मनोहर खाळपे यांनी सांगितले की,आमच्या मागण्याचा सरकारने विचार न केल्यास सरकारला धनगर समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल. पवित्र भंडारा जर सरकारमधील मंत्र्यांना चालत नसेल तर सरकार मधील मंत्र्यांना रस्तावर फिरू देनार नाही.


यावेळी भाऊराव वरखेडे, अमित भिवटे, दिलीप भिवटे प्रमोद, भाऊ तीतरे, संतोष वसतकार, विठ्ठल सुषिर, विजय काळदाते, श्रीराम सुशीर, सुनील भिवटे, अरुण बोळे, अशोक साबे, जनार्दन भिवटे गोपाल कात्रे भाऊराव खरात गजानन वाघमारे विश्वनाथ वाघमारे, भीमराव घुले, नाना कोकरे, अमोल वसतकार शरद भाऊ देवळे विनोद बरींगे, वैभव मोरे, गोपाल कात्रे यांच्या सह असंख्य समाज बांधव उपस्थित होते.

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली शैक्षणिक सत्र २०२३-२४ करिता प्रवेशासाठी मुदत वाढ

## गुरुदास कामडी यांच्या मागणीला यश

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली कार्यक्षेतील पदव्युत्तर विभाग व संलग्नित महाविद्यालयात चालू नवीन शैक्षणिक सत्र २०२३-२४ करिता प्रवेश प्रक्रिया सुरु झाली होती.विद्यापीठ अधिसूचना /जा.क्र./४३४/२०२३ दिनांक २२ ऑगष्ट २०२३ नुसार प्रवेश घेण्याची अंतिम मुदत ६ सप्टेंबर २०२३ पर्यंत होती. परंतू अनेक विद्यार्थी व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा प्रतिक्षेत असल्यामुळे, दिलेल्या मुदतीत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही. त्यामुळेच विद्यार्थ्यांचे प्रवेशा अभावी शैक्षणिक नुकसान होत होते. शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांनी व्यवस्थापन परिषद- अधिसभा सदस्य गुरुदास कामडी यांच्याकडे प्रवेशासाठी



मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी केली होती. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी व्यवस्थापन परिषद-अधिसभा सदस्य गुरुदास कामडी यांनी दिनांक ७ सप्टेंबर २३ रैजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेत शैक्षणिक सत्र २०२४३-२४ करिता विद्यापीठ पदव्युत्तर व संलग्नित महाविद्यालयातील प्रवेशाला १५ दिवसाच्या मुदतवाढ देण्याची मागणी लावून धरली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून ,सदर बाब विद्यापरिषदेत ठेवून प्रवेशाला मुदतवाढ देण्यात आली आहे. व्यवस्थापन परिषद-अधिसभा सदस्य गुरुदास कामडी यांच्या मागणीला यश आले आहे.विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये. यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना विद्यापीठ अधिसूचना गोविग/विद्या/ जा.क्र./४९०/२३ दिनांक ११ सप्टेंबर २०२३ नुसार १५ दिवसाची दिनांक २१ सप्टेंबर २३ महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. गुरुदास कामडी यांनी नेहमीच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य दिले आहे. शैक्षणिक समस्या सोडवण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत. याबद्दल प्रवेशापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे व व्यवस्थापन परिषद-अधिसभा सदस्य गुरुदास कामडी यांचे आभार व्यक्त केले आहे.

# बहुजन समाज पार्टी धुळे लोकसभा स्वबळावर लढवणार : आनंद सैंदाणे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची



बैठक नुकतीच संपन्न झाली या बैठकीमध्ये बहेन कुमारी मायावतीजी यांनी घेतलेल्या निर्णयावर चर्चा करण्यात आली यावेळी असा निर्णय घेण्यात आला. बहुजन समाज पार्टी महाराष्ट्रातील संपूर्ण 48 लोकसभेच्या जागा स्वबळावर लढवणार असून. 2024 च्या निवडणुकीमध्ये बहुजन समाज पक्ष NDA किंवा INDIA या आघाडीमध्ये न सहभागी होता बसपा स्वबळावर महाराष्ट्रातील 48 लोकसभेच्या सीट लढवणार असून त्या निर्णय च्या अनुषंगाने धुळे लोकसभेची जागा बसपा स्वबळावर लढवण्याचे आज पत्रकाद्वारे जाहीर करण्यात आले आहे. सदर प्रदेश बैठकीमध्ये जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांना कामाला लागण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत 2024 ची लोकसभा बहुजन समाज पार्टी पूर्ण ताकदीनिशी लढवणार आहे. तसेच इंडिया आघाडीच्या मीटिंगमध्ये सहभागी होणाऱ्या माजी जिल्हा अध्यक्ष प्रा.अनिल दामोदर यांच्यावर पक्षशिस्त मोडली म्हणून महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड.मा. संदीप ताजने यांच्या आदेशानुसार पक्षातू निलंबित करण्यात आले आहे यापूढे बसपाचे नाव त्यांना वापरता येणार नाही व याचा पक्षाशी कुठलाही संबंध नाही, असे पत्रक देखिल बहुजन समाज पार्टी धुळे जिल्हा शाखेच्या वतीने प्रसिद्ध देण्यात येत आहे.

# विवेकानंद विद्या मंदिर लोणारमध्ये दहीहंडी उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** शहरातील विवेकानंद विद्या मंदिर शाळेमध्ये दहीहंडी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. श्रीकृष्ण-राधा यांची वेशभूषा करून विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले. दहीहंडी उत्सवात बऱ्याच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शाळेचा परिसर छोट्या छोट्या चिमुकल्यांनी श्री कृष्ण, राधा, सुदामा, नंदबाबा या सारख्या भूमिकांनी फुलून आला होता. तसेच या कार्यक्रमात पालक गोविंद दीडवाणी व त्यांची पत्नी यांनी यशोदा माता व नंदबाबा ची भूमिका साकारून आपली रुची दर्शविली. शाळेत बांधण्यात आलेल्या दहीहंडी श्रीकृष्ण रुपातील बालकांनी फोडली. दहीहंडी फोडून गोविंदा आला रे आला अश्या घोषणा देण्यात आल्या, छोट्या विद्यार्थ्यांनी गरबा नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे संचलन सौ. विद्या श्यामसुंदर केला यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडावा म्हणून सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# गोकुळाष्टमीनिमित्त श्री भगवान बाबा बालिका आश्रमात दहीहंडीचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्री भगवान बाबा बालिका आश्रम बीड बायपास येथे गोकुळ अष्टमी निमित्य आश्रमातील सर्व लहान बालका साठी दही हांडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरवात श्री गणेश वंदना, मारुती वंदनाने केली व तसेच हनुमान चालीसाचा पाठ करण्यात आला. त्यानंतर दहीहंडी आश्रमातील बालकांचा हस्ते फोडण्यात आली. ह्या कार्यक्रम ला रोट्रॅक्ट क्लब ऑफ अचीवर्सचे अध्यक्ष ऐश्वर्य दरगड,सचिव प्रथमेश भारुका, तसेच क्लबचे सदस्य अनुष्का पांडे, मानसी अग्रवाल,नूपुर जोशी, शिवम भारूका, केतन धनावत, हिमांशु राठोड, ऋषिकेश पवार, चेतन राठी व श्रीनाथ मानधने ह्या सर्वांनी परिश्रम घेतले. तसेच यश कॉलेज ऑफ फार्मसी ह्यांचा ही सहभाग होता.

वरील कार्यक्रम सुनियोजीत पार पाडण्यासाठी आश्रमाच्या संचालिका सौ. कविता वाघ, काळजी वाहक शोभना गोसावी, शोभा गांधी तसेच सदस्य नितीन घुगे, दिनेश तिवारी, साबु सर व सौ.घुगे मॅडम या सर्वांचे सहकार्य लाभले. ह्या कार्यक्रमात आश्रमातील सर्व मुलांमुलीनी उत्साहाने सहभाग घेतला.



# मोताळ्यातील उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली


आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मराठा आरक्षण व लाठीमारप्रकरणी गृहमंत्री फडणवीस यांनी राजीनामा द्यावा या मागण्यासाठी बेमुदत उपोषण करणाऱ्या मोताळा येथील आंदोलकांची प्रकृती आज पाचव्या दिवशी खालावली. यामुळे दोघांना आज दुपारी रुग्णालयात हलविण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू आहे. शुभम घोंगटे व निलेश सोनुने अशी मोताळा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या उपोषणकर्त्यांची नावे आहे. सुनील कोल्हे, रावसाहेब देशमुख, अमोल देशमुख, शुभम घोगटे, निलेश सोनुने, ओमप्रकाश बोर्डे यांनी ८ पासून उपोषण सुरु केले होते. आज मंगळवारी सहा पैकी वरील दोघांची प्रकृती बिघडल्याने डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. आरोग्य व प्रशासनाच्या वरिष्ठ सूत्रांनी विनवणी केल्यावर दोघेजण उपचारास तयार झाले. त्यांच्यावर तत्काळ उपचार सुरू करून 'सलाईन' देण्यात येत आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# प्लास्टिक निर्मूलनासाठी रिसोड शहरात जनजागृती मोहीम

## तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद खडसे पाटील**

**रिसोड :** स्वच्छता हा आरोग्याचा मूलमंत्र आहे. स्वच्छता माणसाचे आत्मदर्शन घडविते. वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच आपले घर, परिसर, गाव आणि आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची सुद्धा जबाबदारी आहे. पण दिवसागणिक वाढत चाललेला प्लास्टिक पिशव्यांचा वापर मोठ्या प्रमाणात अस्वच्छतेला आमंत्रण देत आहे. परिणामी, मानव जातीलाच नव्हे; तर सृष्टीच्या पर्यावरणावर देखील खूप विपरीत परिणाम होत आहे. प्लास्टिक वापरावर आळा बसावा व सर्वत्र स्वच्छता नांदावी या दृष्टीने राज्य व केंद्र सरकार विविध अभियान राबवीत आहे. सदर अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून, प्रशासन देखील प्रयत्नशील आहे. त्याअनुषंगाने रिसोड शहरात नुकतेच तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या नेतृत्वात जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

नागरिकांनी फेकलेल्या प्लास्टिक पिशव्यामुळेच गटार आणि नाले तुंबत असल्याचे अनेक वेळा केलेल्या सर्वेक्षणातून दिसून आले आहे. शहरातील प्लास्टिकचा वापर कमी झाला तर नक्कीच शहर स्वच्छ व सुंदर होण्यास मदत होईल. पण, या कार्यासाठी केवळ नगरपरिषद आणि संबंधित प्रशासनानेच पुढाकार घेऊन ध्येयपूर्ती होणार नाही..! त्यासाठी या मोहिमेत प्रत्येक नागरिकांनी माझे शहर स्वच्छ शहर ! ही माझी जबाबदारी हे ब्रीद ओळखून उत्स्फूर्त सहभाग घ्यावा. हाच या विशेष जनजागृती मोहिमेचा उद्देश आहे. तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या सदर मोहिमेत नगरपरिषद, समता फाउंडेशन, जमात ए इस्लामी हिंद, व्यापारी संघ, पत्रकार, पोलीस स्टेशन व नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी,तसेच शहरातील जय लखमा डीएमएलटी कॉलेज आणि साईलीला ऑटो युनियन आदींनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. शिवाय घंटागाडी, रुग्णवाहिका तसेच अनेक ऑटो वाहनाचा ताफा सामील झाल्यामुळे जनजागृती रॅली अधिकच प्रभावी ठरली.



यावेळी मार्गदर्शन करताना तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर म्हणाल्या, "मानवी कल्याण आणि वसुंधरेच्या शाश्वत अस्तित्वासाठी सर्वांनी प्लास्टिकमुक्त शहर करण्यासाठी माझं शहर, स्वच्छ शहर या मोहिमेत सहभागी व्हावे ! जेणेकरून ही मोहीम निरंतर सुरू राहील . प्लास्टिक मधील घातक रसायने मातीमध्ये मिसळून मातीची कस व उत्पादकता कमी होत आहे . या सर्व बाबी मानवी जीवनावर आणि पर्यावरणावर घातक परिणाम करणाऱ्या आहेत . त्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपली जबाबदारी ओळखून पुढाकार घेतलाच पाहिजे . .!"





# जलजीवन मिशन क्षमता बांधणी शिबिरास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** राज्य पाणी व स्वच्छता मिशन महाराष्ट्र राज्य, पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद नांदेड व केआरसी टेक्नोस्पर्ट ग्रामविकास प्रतिष्ठान, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जल जीवन मिशन प्रशिक्षणास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तालुक्यातील प्रत्येक गावातील सरपंच, ग्रामसेवक, पाणीपुरवठा समिती सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, बचत गट प्रतिनिधींच्या ऊपस्थितीत नूकतेच प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. शहरातील दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, कला वाणिज्य विज्ञान, भोकर येथे दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण घेण्यात आले. गटविकास अधिकारी डी. एस. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर घेण्यात आले. प्रशिक्षणाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली. प्रशिक्षणात जल जीवन मिशन प्रकल्पाचा उद्देश, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांची भूमिका व जबाबदारी आणि प्रकल्पाची अंमलबजावणी देखभाल व दुरुस्ती प्रत्येक कुटुंबाला स्वच्छ आणि सुरक्षित व शाश्वत ५५ लिटर पाणी देण्याचे अनुषंगाने शासन, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मुख्य भूमिका इत्यादी विषयांचे सत्राद्वारे प्रशिक्षण संस्थेचे मास्टर ट्रेनर यांच्याकडून देण्यात आले. जलजीवन मिशन हा भारत सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पांतर्गत प्रत्येक कुटुंबाला स्वच्छ आणि सुरक्षित पाणी नळाद्वारे नियमित उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. प्रशिक्षण कार्यक्रमास मराठी पत्रकार संघाचे कार्य अध्यक्ष पत्रकार बी आर पांचाळ, पत्रकार बाबुराव पाटील, विस्ताराधिकारी कांबळे, ग्रामसेवक व सरपंच यांनी प्रशिक्षणास सहकार्य केले तसेच, बी.आर. पांचाळ यांनी प्रशिक्षणात आलेल्या प्रशिक्षणार्थी यांच्याशी संवाद साधला, प्रशिक्षण घेऊन प्रत्येक गावागावात जलजीवन मिशन योजनेची अंमलबजावणी कशी होते, याबाबत सर्वांनी लक्ष घालावे, असे मत मांडले जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष नांदेडचे एचआरडी मानवतकर बीआरसी यांनी वेळोवेळी कार्यक्रमास भेटी देऊन कार्यक्रमाची व्यवस्थापन व गुणवत्ता तपासली आणि प्रशिक्षणार्थींना महत्त्वाचे मार्गदर्शन केले. वरील प्रशिक्षण वेगवेगळ्या बॅचद्वारे विविध सत्रांमध्ये पीपीटी च्या माध्यमातून व खेळांच्या माध्यमातून आणि संबंधित उदाहरणांच्या माध्यमातून केआरसी संस्थेचे प्रवीण प्रशिक्षक यांच्याद्वारे देण्यात आले. संस्थेच्या मुख्य प्रवर्तक कल्पना कूलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

# रश्मी सामंत यांच्या 'ए हिंदू इन ऑक्स्फर्ड' पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मंदिरांचे गाव अशी ओळख असलेल्या कर्नाटकातील उडुपी या लहानशा शहरातील मुलगी उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडमधील जगविख्यात ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश घेते. लोकशाही पद्धतीने विद्यापीठाच्या विद्यार्थी संघटनेची अध्यक्ष म्हणून निवडून येते, मात्र हिंदू असल्याने विद्यापीठ आणि ब्रिटिश समाज तिला नाकारतो, या दबावामुळे अखेर ती अध्यक्षपदाचा राजीनामा देते पण धाडसीपणे आपल्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडते. या विद्यार्थिनीचे नाव रश्मी सामंत. त्यांनी लिहिलेल्या 'ए हिंदू इन ऑक्स्फर्ड' या पुस्तकाचे प्रकाशन ख्यातनाम लेखिका शेफाली वैद्य यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. माजी खासदार प्रदीप रावत या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. विश्व संवाद केंद्र, पुणे चे कार्यवाह नितीन देशपांडे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

ऑक्स्फर्ड विद्यापीठात वयाच्या २० व्या वर्षी अनुभवलेले जीव घुसमटवून टाकणारे दुष्टचक्र, जीवे मारण्याच्या धमक्या, दबावामुळे दिलेला राजीनामा, आपल्यावर झालेल्या अन्यायाविरोधात दिलेला लढा, या संघर्षात सोशल मिडियातील पाठीराखे आणि भारतातील काही वृत्तवाहिन्यांनी दिलेला आधार, त्यातून जगाला घ्यावी लागलेली दखल यासंदर्भातील अनुभवांद्वारे रश्मी सामंत यांनी उपस्थितांशी संवाद साधत आपला हा संघर्ष उलगडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पांचजन्य फाऊंडेशनचे सचिव समीर कुलकर्णी यांनी केले तर न्यूज भारतीच्या हिमाली नलावडे यांनी सूत्रसंचालन केले.






# आशा सेविकांकडचे ऑनलाईन काम रद्द न केल्यास आरोग्य मंत्र्यांच्या घरावर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्ह्यातील आशा सेविका गटप्रवर्तक यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना व आयटकच्या पुढाकाराने जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले होते.यावेळी बोलतांना स्वाभिमानीचे युवक प्रदेशाध्यक्ष दामुअण्णा इंगोले यांनी मागण्या मान्य न झाल्यास आरोग्य मंत्र्यांच्या घरावर आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला.

आशा सेविकांकडील अतिरिक्त ऑनलाईन कामे बंद करण्याची त्यांची प्रमुख मागणी होती. या संदर्भात आयुक्तांकडे पाठपुरावा करणार असल्याचे लेखी पत्र जिल्हा परिषद प्रशासनाने इंगोले यांना दिले आहे.

आशा सेविकांना प्रधानमंत्री मात्रृ वंदना योजना,आ.भा कार्ड व गोल्डन कार्ड काढण्याचे ऑनलाइन काम व ग्राम आरोग्य पोषण व पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VHNSC) चे काम आशा वर्कर यांना देऊन या कामाचे पर्यवेक्षणाचे काम गटप्रवर्तकांना देण्यात आले होते. ही कामे करण्याची क्षमता व शिक्षण नसल्याने ती कामे आशा सेविकांकडून काढून घेण्यात यावेत. यासाठी हे आंदोलन करण्यात आले.

जिल्ह्यातील बहुतांश आशा सेविकांकडे स्मार्टफोन नाहीत, ब-याच आशा सेविकांची पुरेशी शैक्षणिक पात्रता नाही. त्यांना संगणकीय कामाचा कोणताही अनुभव अथवा प्रशिक्षण नाही, त्यांना इंग्रजी भाषेच परिपूर्ण ज्ञान नाही. त्यामुळे आशां सेविकांना कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन कामे करणे शक्य नाही. ही कामे करण्यासाठी आशा सेविकांसह गटप्रवर्तकांना तालुका स्तर व प्रा.आ.केंद्र स्तरावरुन मोठ्या प्रमाणात बळजबरी करून दबाव टाकला जात आहे. अनेक ठिकाणी आशा व गटप्रवर्तकांना कामा वरुन काढून टाकण्याची धमकी सुध्दा देण्यात येत आहे. त्यामुळे याविरोधात आशा सेविका व गटप्रवर्तक यांच्याकडून हे ठिय्या आंदोलन करण्यात आले होते.

